|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : २ सोमवार दि. ०३ जानेवारी २०२२ ते रविवार दि. ०९ जानेवारी २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड



नववर्षाच्या पहाटेसह तुमचं
आयुष्य होवो प्रकाशमान,
तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबाला
नववर्षाच्या शुभेच्छा छान!
नूतनवर्षाभिनंदन!
2022
संपादक : लक्ष्मणराव पाटोळे


## ५० रुपयांसाठी जन्मदाता बापच बनला साप पोटच्या पोराला ठार मारून केले भयंकर पाप

ठाणे/आकाश गायकवाड



दारूचे व्यसन माणसाला कुठल्या थराला नेईल याचा नेम नाही. दारूच्या नशेत माणसाला रक्ताच्या नात्याचीही ओळख राहत नाही. दारूला पैसे नसले कि माणूस वेडापिसा होतो आणि त्यातून मग त्यातून त्याच्या हातून कोणताही गुन्हा घडू शकतो. दारू पिण्यासाठी पैसे दिले नाहीत म्हणून मुलाने जन्मदात्या आईची हत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. दारूसाठी बापाने पोटच्या पोरांना विकल्याचे सुद्धा अनेकांनी पाहिले आहे. दारुडा माणूस आपल्या घरातील लेकी बळींच्याही अब्रूची सुद्धा पर्वा करीत नाही. कित्येक दारुड्या बापांनी केवळ दारूसाठी पोटच्या पोरींना दुसऱ्याच्या बिछान्यावर ढकलले आहे. दारूच्या नशेत पोरीच्या अब्रूवर डंका घालणारे वासनांध बापही समाजात आहेत. म्हणूनच दारूचे दुष्परिणाम लक्षात घेऊन सरकारने दारूबंदी करायला हवी होती. पण सरकारला सर्वाधिक महसूल दारूतूनच मिळत असल्याने सरकार कदापि दारूबंदी करू शकत नाही. पण या दारूमुळे समाजाची किती आणि कशी वाट लागतेय किती संसार उध्वस्त होत आहेत, याकडे सरकार कधी लक्ष देणार? दारूच्या नशेत माणूस हैवान बनतो. कुटुंबाचे जिणे हराम करतो आणि कधी कधी रक्ताच्या नात्यालाही कलंकित करतो. दिवसभर कष्टाचे काम करून मिळवलेले मेहनतीचे पैसे दारूच्या प्याल्यात बुडवताना त्याला काहीच वाटत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे दारुडा माणूस संशहयी असतो. आपल्या खिशातले पैसे घरातली माणसे काढून घेतात. त्यामुळे आपले दारू प्यायचे वांदे होतात, असा जेंव्हा त्याच्या मनात संशय येतो. तेंव्हा मग तो घरातल्याच माणसांना पत्नी किंवा मुलांना मारझोड करू लागतो. अशीच एक हृदय पिळवटून टाकणारी घटना ठाण्यातील कळव्याच्या झोपडपट्टीमध्ये घडली आहे.



या ठिकाणी दारुड्या बापाने आपल्या १० वर्षांच्या मुलावर ५० रुपये चोरल्याचा संशय घेऊन दारूच्या नशेत त्याला डोक्याची कवटी फुटेपर्यंत बेदम मारहाण केली. यात मुलाचा मृत्यू झाला. या प्रकरणी कळवा पोलिसांनी दारुड्या बापाला अटक केली असून न्यायालयाने आरोपी बापाला ५ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

कळवा येथील झोपडपट्टीत प्रामुख्याने युपी बिहारचे मजूर राहतात. दिवसभर हमाली किंवा दुसरे छोटेमोठे काम करून कसा तरी कुटुंबाचा चरितार्थ चालवतात. यातील बहुतेकांना दारू जुगार यासारखी व्यसने असतात. अशांपैकीच एक होता संदीप उर्फ बबलू ओमप्रकाश प्रजापती. बबलू बिहारी असून त्याला एक मुलगा तीन मुली आहे. तिसरी मुलगी अवघी एक महिन्याची आहे. बबलू बिगारी काम करायचा. पण कामाचे पैसे दारूत उडवायचा. त्यामुळे घरात भांडणे व्हायची. शुक्रवारी बबलूच्या खिशातले ५० रुपये गायब झाले. त्यामुळे तो भयंकर चिडला. सुरवातीला त्याला वाटले पत्नीने पैसे घेतले. पण तिने नाही म्हणताच त्याला १० वर्षांच्या मुलावर संशय आला. त्यामुळे त्याने त्या मुलाला बेदम मारहाण केली. यात त्याची कवठी फुटून त्याचा मृत्यू झाला. यावेळी बबलूची पत्नी ...पान २ वर

## लग्नानंतरही चालू होती त्यांची लव्ह स्टोरी प्रियकराने तोडली तिच्या आयुष्याची दोरी



मयत सुचिता

जळगाव/क्राईम रिपोर्टर

माणूस पहिले प्रेम कधीच विसरू शकत नाही. पण कधी कधी हे पहिले प्रेमाचं माणसाच्या जीविताची प्राणघातक ठरते. भुसावळमध्ये राहणाऱ्या सूचिताचे सुद्धा असेच झाले. प्रियकराने शिकायचे असल्याचे सांगून लग्नास नकार दिल्याने तिच्या आईवडिलाने तिचे दुसऱ्याशी लग्न झाले. त्याच्या पासून तिला मुलगा झाला असे असताना ती पहिल्या प्रियकराच्या नदी लागली आणि त्याच्या सोबत राहू लागली. पण तो तिच्या पहिल्या पतीपासून झालेल्या मुलाला स्वीकारत नव्हता. तसेच तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता आणि त्यातूनच झालेल्या वादातून त्याने तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीस अटक केली आहे.

सुचिता आणि शुभम हे दोघे एकाच शाळेत शिकत होते. भुसावळ शहराच्या आरपीडी रस्त्यावरील श्री संत गाडगे महाराज हिंदी हायस्कुल मध्ये दोघांचे शिक्षण सुरु होते. बारावीच्या वर्गात शिकत असतांना दोघे एकमेकांकडे आकर्षित झाले होते. टीन एज अर्थात तेरा ते वीस या वयोगटातील तरुण तरुणींमध्ये एकमेकांबद्दल मोठ्या प्रमाणात आकर्षण असते. या वयात एखाद्या मुलीने एखाद्या मुलाकडे केवळ दृष्टीक्षेप टाकला तरी त्या मुलाच्या मनात शहारे निर्माण होत असतात. आपल्याकडे एखाद्या मुलीने कटाक्ष टाकत केवळ स्मित हास्य केले तरी त्या मुलाला खुप मोठेपणा वाटत असतो. मुलगी आपल्यावर खुश असल्याचा भ्रम निर्माण होऊन आपण जग जिंकल्यासारखे त्या तरुणाला या वयात वाटते. सुचिता व शुभम या जोडीचे देखील असेच काहीसे झाले होते. एकाच वर्गात दोघे शिकत होते. प्राथमिक अवस्थेत दोघांच्या नजरेचा गुलकंद लवकरच प्रेमाच्या फुलात रुपांतरीत होण्यास वेळ लागला नाही. या वयातील प्रेम हे प्रेम नसून केवळ आकर्षण असते याची कल्पना अनेक तरुण तरुणींना नसते. प्रेमाची परिभाषा समजण्या इतपत दोघांमध्ये परिपक्वता आलेली नसते. या वयात केवळ शिक्षणाकडे लक्ष देण्याची गरज असते हे अनेक टीन एजर तरुण तरुणींना समजत नसते. ओमप्रकाश रविदास खरे हे एक खासगी नोकरदार होते. भुसावळ शहरातील कवाडे नगरात राहणाऱ्या ओमप्रकाश खरे यांच्या खांद्यावर पत्नीसह तीन कन्या व दोन पुत्र अशा सहा जणांची पर्वताएवढी जबाबदारी होती. सकाळ झाली म्हणजे जेवणाचा टिफीन सोबत घेत नोकरीनिमित्त जळगावला जाणे व रात्री भुसावळला परत येणे असा त्यांचा दिनक्रम होता. साहजीकच दिवसभर जळगावला नोकरी करत असल्यामुळे आपल्या संसाराकडे पुरेसे लक्ष देणे ओमप्रकाश यांना शक्य होत नव्हते. दरम्यान सुचिताचे शाळेतील शुभम बारसे ...पान २ वर



आरोपी शुभम

## शरीरसुखासाठी तिने याराला पटवले पती मधे येताच त्याला मार्गातून हटवले

आठपाडी/क्राईम रिपोर्टर



मयत सतीश

अनैतिक संबंध हे फार काळ लपून राहत नाहीत आणि जेंव्हा अशा संबंधांना नात्यातल्या माणसांचीच साथ मिळते तेंव्हा मग त्या बाईला रान मोकळे मिळते. अशावेळी तिच्या अनैतिक संबंधांच्या आड जर तिचा पती आला, तर मग ती आपल्या नातेवाईकांच्या मदतीने नात्यालाही मार्गातून हटवायला मागेपुढे पाहत नाही. खरसुंडी इथल्या चंदाचे सुद्धा तसेच झाले होते. तिचे लग्न तर झाले, पण पतीकडून मनासारखे सुख मिळत नसल्याने तिने दुसऱ्याला जवळ केले. तिच्या या अनैतिक संबंधाला माहेरच्या लोकांचा पाठींबा असल्याने एकेदिवशी चंदाने आणि तिच्या माहेरच्या लोकांनी मिळून चंदाच्या पतीची हत्या केली आणि त्याचा मृतदेह फासावर लटकवून आत्महत्येचा बनाव केला. पण पोलिसांनी त्यांचा हा बनाव हाणून पाडीत सर्वांना अटक केली.

चंदा हा तशी साधी वागत राहत असली तरी ती तशी नव्हती. ती चालु होती. पतीच्या माघारी ती विवाहबाहय संबंधात एका परपुरूषाच्या नादाला लागलेली होती. पतीपासून तिला ते सुख मिळत नसल्याने ती त्या पुरूषाला चिकटली होती. तिच्या त्या संबंधाबद्दल तिच्या भावाला, बहिणाला तिच्या नवऱ्याला ...पान २ वर

## बँक कर्मचाऱ्याचा गोळ्या घालून जीव घेतला बापाचे कर्ज फेडण्यासाठी मुलाने दरोडा घातला







मुंबई/एस.कुमार

कर्जाचे टेन्शन बहुतेक लोकांना असते. त्यामुळे काहीजण मेहनत मजुरी करून कर्ज फेडतात, तर काही लोक कर्ज फेडण्यासाठी चक्क गुन्हेगारीचा मार्ग अवलंबतात. दहिसरमधील अशाच एका घटनेत बापाचे कर्ज फेडण्यासाठी मुलाने बँकेवर दरोडा घालून दोन लाख सत्तर हजार लुटले. या दरोड्याच्या वेळी त्याच्या हातून एका बँक कर्मचाऱ्याचा खूनही झाला. मात्र पोलिसांनी या दोन आरोपींना अवघ्या आठ तासात अटक केली. दहिसरच्या स्टेट बँक ऑफ इंडिया येथे दिवसा ढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे केवळ दहिसरच नव्हे तर संपूर्ण मुंबई हादरून गेली होती.

दहीसर स्टेशन जवळचे गुरुकुल बिल्डींगच्या तळमजल्यावरील स्टेट बँक ऑफ इंडीयाचे कार्यालय आहे. या बँकेचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरळीत चालू होते. दुपारची साडेतींची वेळ होती. दुपारची वेळ असल्याने बँकेत ग्राहकांची तुरळक गर्दी होती. आतमध्ये कॅशिअर पैशाची देवाणघेवाण करत होते. तर बँकेचा कंत्राटी कर्मचारी संदेश गोमरे (२५) हा बँकेच्या प्रवेशद्वारा समोर बसला होता. इतक्यात डोक्यावर टोपी आणि मास्क घातलेले दोन तरुण बँकेच्या प्रवेशद्वाराजवळ आले. संदेश त्यांना काही विचारणार तोच या दोघांतील एकाने त्याच्यावर पिस्तूलातून गोळ्या झाडल्या. बँकेत सुरक्षा रक्षक नसल्याने हल्लेखोरांना रोखण्यासाठी कुणीच नव्हते. एक गोळी संदेशच्या छातीत घुसली व तो जागीच कोसळला. ...पान २ वर

## रक्ताच्या नात्याचा घरातच पडला सडा दारुड्या हनुमंताच्या पापाचा भरला घडा

कवठेमंहाकाळ/क्राईम रिपोर्टर

दारुडा माणूस हा संपूर्ण कुटुंबासाठी डोकेदु:खी ठरलेला असतो. कारण तो नेहमी दारू पिऊन घरात धिंगाणा करीत असतो आणि त्याच्या याच धिंगाण्यामुळे कुटुंबाची सुखशांती हरवलेली असते. हनुमंत माली याला दारूचे व्यसन लागल्या पासून माली कुटुंबाची सुद्धा अशीच अवस्था झाली होती आणि आता तर हनुमंत शेतीची वाटणी करायची मागणी करू लागला. यावर एकेदिवशी कडाक्याचे भांडण होऊन बापाने आणि मोठ्या भावाने हनुमंतला कायमचा संपवून टाकले. रक्ताच्या नात्यात रक्ताचा सदा पडला. या प्रकरणी पोलिसांनी बाप बेट्यानं अटक केली आहे.

कवठेमंहकाळ जवळीत कुची येथे माळी वस्तीत वसंत माळी हे आपल्या परिवारासह राहयला आहेत. त्याची गावातच थोडी फार शेतजमीन असून त्यावरच त्याच्या कुंटूंबाचा उदरनिर्वाह चालत असतो. त्याच्या शेतात विहिर असल्याने त्या विहिरीच्या पाण्यावर ते शेतीचे बारमाही पीक घेत असतात. तशी त्याची कौटुंबिक परिस्थीती ही बेताचीच आहे. तरी ही शेतीच्या उत्पन्नामुळे त्याना थोडा फार हातभार हा लागत आहे. त्याना दोन मुले एक मारूती तर दुसरा हणंमत या दोघांना ही बायका मुले असल्याने त्याचा संसार ही सुरळीत चालू होता. वसंत माळी हे वयाची ७० ओलांडल्याने ते तसे शेताकडे कमीच लक्ष देत होते. माळी वस्तीत ते राहत असल्याने त्याच्या शेजारी त्याचे भाऊबंद राहत होते. त्यातच त्याचा ...पान ६ वर

## दारूच्या व्यसनामुळे पुरता कामातून गेला अखेर बहिणीच्या हातून सख्खा भाऊ मेला

भंडारा/क्राईम रिपोर्टर



मयत रोशन

बहीण भावाचे नाते पवित्र मानले जाते. जेंव्हा आई वडील नसतात तेंव्हा मोठी बहीण आई होऊन आपल्या धाकट्या भावंडांचा सांभाळ करते. भंडारा जिल्ह्यातील पंधरा शिवारात राहणाऱ्या सख्ख्या बहिणीने आपल्या लहान भावाचा आई बनून सांभाळ केला. पण तो दारुडा निघाला आणि तिच्यासाठी डोके दुखी ठरू लागला. तेंव्हा मात्र तिने आपल्या धाकट्या मेव्हण्याच्या मदतीने दारुड्या भावाला संपवले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी बहिणीसह तिच्या साथीदारांनाही अटक केली आहे.



दगडाने ठेचून एका तरुणाचा निर्घृण खून केल्याची घटना भंडारा जिल्ह्याच्या मोहाी तालुक्यातील आंधळगाव पोलीस स्टेशन हद्दीतील कान्द्री जवळील पांजरा शिवारात घडली. घटनास्थळी आंधळगाव पोलीस पोहचवून घटनेचा पंचनामा करीत तपासाचे चक्र झपाट्याने वाढविले. अवघ्या चार तासातच मृतक रोशन रामू खोडके (वय २८) वर्षे राहणार कांद्री याच्या मारेकऱ्याला त्यात त्याची सख्खी मोठी बहीण लहान मव्हने व त्याच्या मित्राला आंधळगाव पोलिसांनी अटक केली. अटक करण्यात आलेल्या आरोपीत मोठी बहीण मनीषा चुधरे व लहान मेव्हणे हीतेंद्र रतिराम देशमुख (२९) व प्रेम उमा चरण सूर्यवंशी (२२) ...पान ६ वर

## शुल्लक कारणावरून निरपराधाची हत्या केली चार अट्टल गुंडाना जन्मठेपेची शिक्षा झाली

मुंबई/शिरिष वानखेडे



मयत उमर

प्रत्येक मोहल्ल्यात कोणी ना कोणी भाई असतोच आणि त्याच्या सोबत काही बिनकामाचे टपोरी लोक असतात. अशा लोकांना ऐरियात दरारा निर्माण करायचा असतो. म्हणून मग शुल्लक कारणावरून कोणालाही टार्गेट करीत असतात. अशावेळी त्यांना कुणी विरोध केला, तर ते त्याचा काटा काढायला मागेपुढे पाहत नाहीत. भाई एकाच्या पायावर थुंकला या शुल्लक कारणावरून भाईला विरोध करणाऱ्याला भाई आणि त्याच्या मित्रांनी संपवले. या प्रकरणी पोलिसांनी चारही आरोपींना अटक करून त्यांच्यावर न्यायालयात खटला दाखल केला आणि सबळ साक्षीपुराव्याच्या आधारे चारही आरोपींना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.



गोवंडी येथील न्यू गौतम नगर प्लॅट नंबर ४ शिवशक्ती सेवा संघ बिरुवा मंदिरा जवळ मोहम्मद उमर फारूक अबू बकर शेख (३५) हा पत्नी शमीदा (३०) व दोन लहान मुलांसोबत राहत होता. तो ग्रांट रोड येथील प्रेन्टिंग प्रेस मध्ये काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. मूळचा केरळ येथील रहिवासी असलेला उमर फारुख शेख याला पाच भाऊ आणि चार बहिणी आहेत. तो आई जैनबी (६०) व लहान भाऊ इब्राहिम अबू बकर शेख (वय ३३) याच्या सोबत एकत्र राहत होता. इब्राहिम हा लेडीज कॅटलरीचा व्यवसाय करत होता. असे हे गरीब व कष्टाळू कुटुंब होते. ते आपण बरे आणि आपले काम बरे या तत्वाने वागत होते. याच परिसरात काल्या जैस्वाल नावाच्या गुंड राहत होता. तो परिसरात भाईगिरी करत होता. सर्वसामान्य लोकांना त्रास देणे हा त्याचा उधोग होता. त्याच्या हाताखाली काही टपोरी पोर होती. ती देखील काल्याच्या नादी लागून वाह्यात गेली होती. ही सर्व टपोरी गँग नशापाणी करून परिसरातील लोकांना छेडत होते. हातावर पोट असलेले गरीब, गरजू लोक यांच्या भाईगिरीला कंटाळले होते. पण कोणी त्याच्या नादी लागत नव्हते. कारण फुकटचे भांडण कोण करणार? टपोरी पोरांच्या मागे लागून आपला वेळ कोणी वाया घालवायचा असा विचार करून सर्व लोक त्यांच्या कडे दुर्लक्ष करत होते. ...पान २ वर

C M Y K

## पान १ वरून....

### ५० रुपयांसाठी जन्मदाता बापच...

घरात नव्हती. दरम्यान कळवा पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी घरात मुलाचा मृतदेह चादरीत गुंडाळलेल्या अवस्थेत दिसला. घरात दोन्ही मुली रडत होत्या. पोलिसांनी त्यांच्याकडे चौकशी केली असता बाबांनीच भावाला मारल्याचे मुलींनी सांगितले. मात्र मुलाला ठार मारून तो पसार झाला होता. पोलिसांनी पंचनामा करून मुलाचा मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर त्या मुलाची आई आणि बबलूची पत्नी यांचा जाबजबाब नोंदवला आणि काही तासातच बबलूच्या मुसक्या आवळल्या. त्यानंतर त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने बबलूला ५ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. कळव्यातील या संतापजनक घटनेने संपूर्ण झोपडपट्टी हादरून गेली आहे. तसेच या प्रकरणी कळवा पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी सुदेश आजगावकर अधिक तपास करीत आहेत.

### लग्नानंतरही चालू होती त्यांची लव्ह ...

या विद्यार्थ्यासोबत प्रेमप्रकरण चांगलेच बहरले होते. दोघांच्या प्रेमाचा सिलसिला कित्येक दिवसांपासून अव्याहतपणे सुरु होता. आता सुचिता लग्नायोग्य देखील झाली होती. त्यामुळे तिच्या लग्नासाठी तिचे पालक योग्य त्या हालचाली करत होते. तिला एक स्थळ देखील या कालावधीत आले होते. आपल्या मुलीचे शुभम बारसे या तरुणासोबत प्रेम प्रकरण सुरु असल्याची भनक ओमप्रकाश खरे यांना दरम्यानच्या कालावधीत लागली. शिक्षण घेत असतांना आपल्या मुलीचे पाऊल या वयात वाकडे पडण्याची शक्यता लक्षात घेत त्यांनी तिला वेळीच समज देण्याचा प्रयत्न केला. आपले शुभमवर प्रेम असल्याची कबुली तिने वडिलांना दिली. त्यामुळे शांत डोक्याने विचार करत त्यांनी तिचे लग्न करण्यापूर्वी शुभम सोबत संपर्क साधला. सुचीताला लग्नाचे स्थळ आले असून आम्ही तिचे लग्न करण्याच्या विचारात व तयारीत आहोत. तुमचे दोघांचे प्रेम प्रकरण सुरु असल्याचे समजल्यामुळे विचारपूर्वक निर्णय घेण्यासाठी आम्ही तुला बोलावले असल्याचे ओमप्रकाश खरे यांनी शुभम जवळ स्पष्ट केले. आपली भूमिका ओमप्रकाश खरे यांनी शुभमजवळ उघड केली होती. त्यावेळी शुभम याने सुचीताच्या वडिलांना सांगितले कि मला अजून पुढे शिकायचे आहे. त्यामुळे सुचीतासोबत या क्षणाला लग्न करण्यास मी तयार नाही असे त्याने स्पष्ट केले. तुम्ही तिचे लग्न कुणासोबतही लावून देऊ शकता असे देखील त्याने स्पष्ट केले. त्यामुळे सुचीतासाठी आलेल्या स्थळाला होकार देण्याचा मार्ग ओमप्रकाश खरे यांच्यासाठी मोकळा झाला होता. त्यानंतर ओमप्रकाश खरे यांनी आपली मुलगी सुचीताचे लग्न मध्य प्रदेशातील तरुणासोबत लावून दिले. लग्नानंतर ती आपल्या सासरी मध्य प्रदेशात संसार करण्यासाठी निघून गेली. हे सर्व खरे असले तरी मनुष्य पहिले प्रेम विसरु शकत नाही याचा प्रत्यय दोघांना काही वर्षांनी आला. सुरुवातीचे दोन वर्ष ती सासरी पतीसोबत राहिली. या कालावधीत ती गर्भवती झाली. पहिल्या बाळंतपणासाठी ती माहेरी भुसावळ येथे आली. ती प्रसूत झाली व तिला पुत्रप्राप्ती झाली. बाळाचे संगोपन करण्यात साधारण तीन महिण्याचा कालावधी लोटला. या कालावधीत माहेरी आलेल्या सुचीताचे पहिले प्रेम उफाळून आले. तिचा व शुभमचा संपर्क सुरु झाला होता. दोघे एकमेकांना विसरू शकत नसल्याचे एकंदरीत दिसून आले. त्यामुळे एके दिवशी घरात कुणाला काही न सांगता ती आपल्या बाळाला सोबत घेत शुभमकडे निघून गेली. तिच्या आई वडिलांनी तिची सर्वत्र शोधाशोध सुरु केली. मात्र तिचा कुठेही तपास लागला नाही. साधारण पंधरा दिवसांनी त्यांना समजले की ती शुभमसोबत त्याच्या आईवडीलांच्या घरी रहात आहे. बाळंतपणासाठी आलेली सुचिता पुन्हा आपल्या पतीकडे न जाता पूर्वाश्रमीच्या प्रियकराकडे राहण्यास गेली होती. पतीपासून झालेल्या बाळाला देखील तिने सोबत नेले होते. दरम्यानच्या कालावधीत ती प्रियकर शुभम पासून पुन्हा गर्भवती झाली. अगोदर पतीपासून व नंतर प्रियकरापासून ती दोनवेळा गर्भवती झाली. मात्र हा प्रेमाचा खेळ फार दिवस तग धरू शकला नाही. सुचीताला पहिल्या पतीपासून झालेल्या मुलाचा सांभाळ करण्यावरून दोघात वाद सुरु झाले. याशिवाय तो तिच्या चारित्र्यावर देखील संशय घेऊ लागला. आगीतून निघून धुळीत पडल्यासारखी तिची गत झाली होती. बघता बघता पहिल्या पतीपासून झालेला तिचा मुलगा चार वर्षाचा झाला. याशिवाय चारित्र्याचा संशय वादाला कारणीभूत होताच. या कटकटीला वैतागून ती पुन्हा आपल्या आईवडिलांकडे राहण्यास आली. मुलीमुळे बापाच्या डोक्याला ताप झाला होता. आता तर शुभम तिला आपल्यासोबत ठेवण्यास तयार नव्हता. त्यामुळे नाईलाजाने तिला वडिलांकडे राहणे भाग होते. आता उदरनिर्वाहासाठी ती शहरातील एका खासगी दवाखान्यात नोकरी करु लागली. संपर्कासाठी तिला मोबाईल गरजेचा होता. त्यामुळे तिला तिच्या वडिलांनी एक मोबाईल घेऊन दिला. तिच्याजवळ मोबाईल असल्याचे समजताच शुभम चिडला. तीचे कुणाशीतरी अनैतिक संबंध असल्याचा त्याला संशय येत होता. ती नेहमी कुणाशी तरी मोबाईलवर बोलत असते याचा त्याला राग होता. रात्रीच्या वेळी एकांतात नेऊन त्याने तिचा धारदार शस्त्राने खून केला. खून केल्यानंतर देखील त्याने तिचा तिच्या ओढणीने गळा आवळला. दुसऱ्या दिवशी सकाळी या घटनेची वाच्यता झाल्यानतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान मयताची ओळख पटलेली होती. भुसावळ शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप इंगळे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यास सुरुवात केली. दरम्यान तिचा पती शुभम बारसे हा फरार झाला होता. मात्र त्याला शोधून काढण्यात पोलीस पथकाला यश आले. त्याने आपला गुन्हा कबुल केला. चारित्र्याच्या संशयातून त्याने तिचा खून केला असल्याचे कबुल केले. आरोपी शुभम सध्या पोलीस कोठडीत आहे.

### शरीरसुखासाठी तिने याराला पटवले...

माहित होते. त्यांनी तिच्या त्या संबंधाला मुक समंती दिली होती. त्यामुळे ती नवऱ्याला किंवा सासरच्या लोकांना घाबरत नव्हती. उलट त्या पुरूषाबरोबर ती राजरोजपणे गुलछर्रे उडवित होती. त्याच्याबरोबर बिनधास्तपणे मजा मारत होती.त्यामुळे त्या दोघा नवरा बायकोत या कारणातून भांडणे होऊ लागली. त्यामुळे तो वैतागून बायकोला घेऊन तिच्या माहेरी खरसुंडी येथे राहु लागला. तेथे ही त्या नवरा बायकोचे पटत नव्हतेखरे तर तिचे विवाहबाहय संबंध हे त्याच्या शिवाय सगळ्यांना माहित असल्याने त्याचे काही चालत नव्हते. त्याचाच त्या संबंधाला तेवढा विरोध होता. म्हणून चंदाच्या सांगण्यावरून तिच्या भावाने, बहिणीने आणि बहिणीच्या नवऱ्याने चंदाच्या नवऱ्याला मारहण करून मारून टाकले आणि त्याचा मृतदेह त्याने गळफास घेतलेल्या स्थितीत अडकविला. जेणे करून त्याने दारूच्या नशेत आत्महत्या केल्याचे त्यांनी भासविले. परंतु पोलीस तपास करीत असताना बाहेरील पायरीवरील रक्ताचे डाग आणि मयताच्या अंगावरील मारहाणीच्या खुणा यातून त्याचा खून झाल्याचे स्पष्ट दिसत होते. आठपाडी पोलीसांनी या घटनेचा योग्य तपास करून सत्य बाहेर काढले आणि संशयीत आरोपीना बेडया ठोकल्या. सतीश उत्तम धुमाळ हा मुळचा माण तालुक्यातील म्हसवड येथील होता. त्याचे गेल्या काही वर्षापूर्वी खरसुंडी येथील चंदा हिच्याबरोबर समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे विवाह झाला. त्या दोघाचा संसार सुरळीत चालू असताना चंदा हिच्या वागण्या बोलण्यात राहणीमानात सतीशला फरक जाणवू लागला होता. तो बाहेर गेला की ती तास न तास आपल्या मोबाईलवरून कुणाशी तरी बोलत गप्पा मारत होती. त्याच्या बरोबर ती बोलताना हसत खिदळत बोलत असल्याने तिच्या सासु सासऱ्यांना तिच्या वागण्याची शंका येवू लागली होती. त्यामुळे त्यांनी मुलगा सतीशला तिच्या अशा बेफिकीर वागण्या बद्दल राहणीमाना बद्दल सांगितले होते. तो ही तिच्यावर आता नजर ठेवून होता. अशातच त्याने एकदा तिच्या माघारी तिचा मोबाईल चेक केला असता त्या मोबाईलवरून ती एका तरूणाबरोबर चॅटिंग करीत असल्याचे दिसून आले. तो आणि ती दोघे ही व्हॉटॲपवरून अश्लिल भाषेत चॅटिंग करीत होते. यावरून सतिशने काय ओळखायचे ते ओळखले होते. त्यातच त्याला आपली पत्नी चंदा ही त्याला बाहेर भेटून त्याचेबरोबर मजा मारत असल्याचे ही समजले होते.त्यामुळे तो तिच्यावर जास्त चिडला होता. तिच्या अशा बेफिकीर आणि बिनधास्त वागण्यामुळे अलिकडे तो जास्तच दारू पिऊन येवून घराकडे येवू लागला होता. दारूच्या नशेत तो तिला मारहाण करून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करीत तुझा यजमान कोण आहे? त्याच्याबरोबर कशाला मजा मारतेस तुला काय लाज लज्जा आहे की नाही असे म्हणत तिला त्याचा नाद सोडायला सांगत होता. पण ऐकेल ती चंदा कसली?तिचे त्याच्याबरोबर संबंध वाढीस लागलेले होते. त्यामुळे ती त्याचेबरोबरचे संबंध तोडायला तयार नव्हती. याला दुसरे ही कारण होते.रात्रीच्या खेळात तिचा नवरा सतीश हा कमी पडत होता. तो तिला पाहिजे तसे सुख देत नव्हता म्हणून ती त्याला कळत नकळतपणे चिकटली होती. त्यातच तो तिच्या माहेरकडचा म्हणजे खरसुंडी येथील असल्याने तिला ही तेच पाहिजे होते. कायम ती काही ना काही कारण सांगून ती माहेरी खरसुंडी येथे त्याला भेटायला जात होती.त्याचेबरोबर मजा मारून झाली की परत ती सतीश कडे येत होती. त्या दोघाचे संबंध वाढीस लागलेले होते. त्याला ही त्या कामासाठी मिळत असल्याने तो ही बिनधास्तपणे तिच्या माहेरच्या घराकडे ती आली की येत होता. त्यामुळे तिचे ते संबंध तिचा भाऊ बहिण आणि बहिणीचा नवरा यांना माहित होते. तो तरूण ही त्याच्या नात्यातील असल्याने त्यांनी त्या दोघांच्या संबंधाला एक प्रकराची संमती दिली होती. त्यामुळे तिचे आयते फावत होते. तो चंदाला बाहेर ही फिरायला नेत होता. त्यामुळे चंदाला आता नवरा सतीश हा नकोच होता. ती प्रियकराबरोबरच जास्त राहत होती. बायको आपली आणि तिच्याबरोबर मजा मारतो दुसराच असे झाल्याने त्याला ही काय करावे आणि काय नको असे झाले होते. भांडणात चंदा त्याचा उपमर्द करत होती.तुझ्यात दम नाही,तू काही कामाचा नाहीस, असे म्हणून ती त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत होती. ती सांगून ही ऐकत नाही,उलट ती तिच्या याराबरोबरच जास्त राहते त्याच्याबरोबर मजा मारते म्हणून तो ही आता चिडला होता. चंदाचे वागणे म्हणजे,पालथ्या घडयावर पाणीच होते. दिसायला ती साधी ती साधी भोळी वाटत होती तरी ती तेवढीच चालू आणि शातीर दिमाखाची होती. नवऱ्याला ती काहीच किमंत देत नव्हती. दोघा नवरा बायकोच्या नात्यात आता तिसऱ्याने डोकावल्याने सतीशच्या आई वडिलांनी त्याला तु तुझी बायको घेऊन दुसरीकडे राहयला जा येथे जगाला तमाशा नको.तुझ्यामुळे आमची समाजात बदनामी होत आहे असे सांगितले त्याच्या सांगण्यावरून सतीशे आता बायकोल घेऊन थेट तिच्या माहेरी म्हणजे खरसुंडी येथे राहयला आला. दोघे नवरा बायको सासरवाडीतील सासऱ्याच्या खोलीत राहत होते. माहेरी नवऱ्याला घेऊन ती राहू लागल्याने तिला तर आता रानच मोकळे झाले होते. नवरा बाहेर कामाला की ती प्रियकराला घरात बोलावून घेत होती. त्याचेबरोबर मजा मारत होती. तिच्या अशा वागण्याला सतीश ही वैतागलेला होता. तो दारू पिऊन येवून चंदाला मारहाण करून त्या तरूणाचा नाद सोड नाही तर मला तर सोड असे सांगत होता. तो चंदाला मारहाण करू लागल्यावर तिचा भाऊ बहिणीचा नवरा बहिण सोडावायला येत होते. त्या भांडणात ते सगळे चंदाची बाजू घेऊन त्यालाच खडे बोल सुनावत होते. तु चांगले वाग. दारू सोड म्हणजे ती ही चांगले वागते असा उपदेश ते करीत होते. चंदाला समाजावून सांगण्याऐवजी ते त्यालाच बोलत असल्याने तो उलट जास्तच चिडत होता.एकदा तर तो कामावरून घरी परत आला असता त्याला आपल्या बेडरूममध्ये पत्नी चंदा आणि तिचा प्रियकर नको त्या अवस्थेत त्याला सापडले होते. त्याने त्या दोघांना रंगेहात पकडून देखील तो त्या दोघांना काही करू शकला नव्हता.कारण सगळे जण चंदाच्या बाजूने बोलणारे होते. त्याचे कुणीच काही ऐकून घेणार नव्हते. चंदाने तर त्याला खडे बोल सुनावत म्हटले की, हाच माझा नवरा आहे.यार आहे मी याच्याबरोबरच मजा मारणार याला मी पाहिज, मला तो पाहिजे., तो मला पाहिजे तसे शरीर सुख देतो. तू नवरा असून बिनकामाचा आहेस. तुझा काहीच उपयोग नाही. यावर त्याने तिला काहीच बोलले नाही. त्या दिवसापासून त्याने तिला काही बोलायचे ही सोडून दिले होते. आता तिला आपल्या त्या संबंधात नवरा सतीश याचा अडसर वाटू लागला होता. त्याला आपल्या मार्गातून बाजुला केले तर आपल्याला आपल्या प्रियकराबरोबर राहता येईल त्याच्या बरोबर बिनधास्तपणे मजा मारता येईल असा तिने सारासार विचार केला आणि तो विचार तिने अमंलात आणण्याचा विचार केला.तिने याबाबत साडू अतुल पवार, मेहुणी सोनिका अतुल पवार आणि मेहुणा चेतन बलभिम वाडेकर यांना विश्वासात नवरा सतीश धुमाळ याचा खेळ खल्लास करायचा आहे त्याची गेम करायची आहे असे सांगितले.ते सगळे सतीशवर चिडूनच होते. त्यातच त्यांनी चंदाची बाजू घेतली असल्याने सतीश याची गेम करायला ते ही एका पायावर तयार झाले. विवाहबाहय संबंध कुठल्या कुठे पोहचून एका वेगळ्या वळणावर पोहचले होते. मजा मारणारे मजा मारत होते. तर विनाकारण एकाला संपविण्याचा घाट चंदाच्या सांगण्यावरून घातला जात होता. मागील काही दिवसापासून चंदा आणि सतीश याचे भांडण वाढले होते तो दारू पिऊन येवून तिला व तिच्या माहेरच्या लोकाना शिवीगाळ देत होता. नेमके हेच कारण त्यांना पुरेसे ठरत होते. गेल्या आठवडयात तो कामावरून घरी परत येताना फुल्ल दारू पिऊन आला.दारूच्या नशेत तो चंदाला तुझा यजमान तुला बोलवत आहे जा. त्याच्याबरोबर झोप जा. असे अश्लिल भाषेत बोलत होता. तिच्याबरोबर भांडत होता. त्या दोघाचे भांडण वाढले होते. तो तिच्या अगांवर धावून जात असतानात त्या दोघांचे भांडण सोडवायला मेहुणी सोनिका पवार मेहुणा अतुल पवार आणि चेतन वाडेकर आले. त्यावेळी त्यांनी चंदाला समाजावून सांगण्याऐवजी सतीश यालाच उलट खडे बोलत सुनावत त्याला मारहण करीत त्याला लाथाबुक्क्यांनी बडवडत होते. ते चौघेजण असल्याने त्याचा तो प्रतिकार करू शकत नव्हता.त्याचवेळी चंदा त्याना चेतवत म्हणाली. मारा त्याला मारून टाका. सोडू नका. मला छळतो मारहाण करतो असे म्हणाली. त्याचवेळी अतुल आणि चेतन यांनी बाजुलाच पडलेले लाकडी दांडा घेतला आणि खाली पडलेल्या सतिश याच्या डोक्यावर घातला.तो घाव सतीश याने कसा तरी चुकविला असताना तो घाव सतीश याच्या कानावर जोरात बसला. त्यावेळी तो कसा तरी उठून पळून जाण्याच्या तयारीत असताना सोनिकाने आणि चंदाने त्याला उठू दिले नाही. त्याला त्यांनी तेथे दाबून धरले. त्यावेळी परत त्या दोघांनी सतीश याच्या अंगावर लाकडी दांडक्याने मारहाण करीत त्याला घायाळ केले. त्याच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तताच्या धारा लागलेल्या होत्या. काही वेळातच तो निपचिप पडला. त्यातच त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा मृत्यू झाल्याचे त्याच्या लक्षात येताच त्या चौघांनी आता त्याच्या मृत्युचा बनाव करण्याचे ठरविले. त्यांनी त्याला उचलून नेत पोर्चमध्ये आणले. पोर्चमधील ॲगलला त्यांनी त्याचा मृतदेह साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत लटकवून सोडला. दुसऱ्या दिवशी त्याने दारूच्या नशेत आत्महत्या केल्याचा बनाव केला. कुणी तरी या घटनेचीम माहिती आठपाडी पोलीसांना दिली. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना मयत सतीश याच्या पत्नीने आणि त्याच्या नातेवाईकांनी सतीशने दारूच्या नशेत आत्महत्या केल्याचे पोलीसाना सांगितले. परंतू पोलीसाच्या नजरेत दुसरेच येत होते. कारण फरशीवर रक्ताचे डाग दिसून येत होते.तसेच मयत सतीश याच्या कानाच्या बाजुला कशाने तरी मारल्याचे तसेच शरीरावर मारहाण केल्याचे दिसत होते. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह आठपाडी येथील शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. शवविच्छेदन रिपोर्टमध्ये मयताच्या डोक्याला मारहाण झाल्याने त्यात त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट केले होते. त्यामुळे पोलीसाना सतीश याचा खूनच झाल्याचे मत व्यक्त करून तपासाला सुरूवात केली. या घटनेची फिर्याद मयत सतीश धुमाळ याचा भाचा अनुराज पवार (२१) रा.म्हसवड याने आठपाडी पोलीसात दिली. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी सतीश उत्तम धुमाळ (३१) याचा खून करून पुरावा नष्ट केले प्रकरणी त्याची पत्नी चंदा धुमाळ, मेहुणा अतुल पवार, मेहुणी सोनिका पवार, साडू चेतन वाडेकर याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,२०१ प्रमाणे त्याचे विरोधात गुन्हा दाखल करून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला लाकडी दांडा जप्त केला. या घटनेचा पुढील पो.निरी.भानुदास निबोरे हे करीत आहेत.

### बँक कर्मचाऱ्याचा गोळ्या घालून...

त्यानंतर ते दोघेही कॅशिअरच्या कॅबिन जवळ आले. कॅशिअर कामात गर्क होता. त्याने मान खाली घालून आपलं काम चालू ठेवलं आणि एका हातानं खातं उघडण्याचा फॉर्म त्यांच्यासमोर धरला. क्षणभरानंतर हातातला फॉर्म का घेत नाही म्हणून त्यानं मान वर केली आणि त्याच्या तोंडाचा 'आ' तसाच राहिला. समोरच्या इसमाच्या हातात 'पेना'ऐवजी पिस्तुल होतं. अधिकाऱ्यानं आपसूक हात वर केले. अधिकाऱ्याचे हात वर झालेले पाहून कॅशिअरजवळच्या इसमाला चेव आला. त्यानं कॅशिअरला पिस्तूलचा धाक दाखवला आणि स्ट्राँगरूमकडे चलण्याची खूण केली. कॅशिअरनं स्ट्राँग रूम उघडली तसं त्या दोघांचे डोळे विस्फारले. दरोडेखोरांनी बँकेच्या कॅश काउंटरमधील रोख रक्कम २ लाख ७० हजार रुपये जबरीने चोरुन घेऊन तेथून पळ काढला. हे सर्व एवढ्या सफाईनं आणि जलदरीतीनं घडलं की दरोडेखोर गेल्यावर सर्वजण भानावर आले. बँक कर्मचारी यांनी प्रथम तातडीने जखमी कर्मचारी संदेश गोमाणे याला शताब्दी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. लगेच या घटनेची खबर एम.एच.बी. कॉलनी पोलीस स्टेशनला देण्यात आली. सदर गुन्ह्याची माहिती मिळताच उत्तर प्रादेशिक विभाग अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीण पडवळ व परिमंडळ १२चे पोलीस उपायुक्त विशाल ठाकूर, दहिसर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त वसंत पिंगळे, बोरिवली विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्त रेखा भवरे यांच्या सह एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवी सरदेसाई, पो.नि. नागटिळक, पो.नि. मते, सपोनि शिरसाट, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउनि विजय धोत्रे, पोउनि रमेश वाघचौरे, दिपक पाटील तसेच एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाण्याचे सर्व अधिकारी आणि अंमलदार घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळची पाहणी करून बँक कर्मचारी आणि काही प्रत्यक्ष साक्षीदार यांच्याकडे चौकशी केली. तसेच बँकेतील सीसीटीव्ही फूटेज तपासणीसाठी ताब्यात घेतले. तेव्हा दोन मास्कधारी तरूणांनी बँक कर्मचारी संदेश याच्यावर केलेला हल्ला आणि बँकेतुन लुटून नेलेली रोख रक्कम बँकेच्या कॅमेऱ्यात कैद झाली होती. गुन्हा गंभीर होता. बँकेच्या ग्राहकांचे पैसे, लुटले गेले होते. या प्रकरणी बोरिवलीच्या एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरोधात गु.र.क्र. ७९८/२०२१ कलम ३०२, ३९७,०६ (२),३४ भादंवि सह कलम ३,२५ आर्मस् ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. दिवसाढवळ्या एका प्रतिष्ठित बँकेवर दरोडा पडल्याने खळबळ उडाली होती. त्यामुळे संपुर्ण पोलीस यंत्रणा कामी लागली होती. या गुन्ह्याचा तपासासाठी उत्तर प्रादेशिक विभागातील पोलीस अधिकारी व अंमलदारांची आठ वेगवेगळी तपास पथके तयार करण्यात आली. या शोध मोहिमेत श्वानपथकाचा ही सहभाग होता. ही सर्व पथके आरोपीचे प्राप्त वर्णन व गुन्हा करुन निघून जाण्याचा मार्ग निश्चित करून त्या मागावर आरोपींचा शोध घेत फिरत होते. पोलिसांना घटनास्थळी आरोपीचे बूट सापडले होते, त्या बुटाचा वास श्वान पथकाला दिल्यानंतर मुंबई पोलिसांचा श्वान आरोपी राहत असलेल्या दहिसर येथील घरापर्यंत पोहोचला, त्यानंतर पोलिसांनी प्रथम त्या घराचा दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. पण आतून कोणताही प्रतिसाद न आल्याने क्राइम ब्रँच आणि सीआयडीच्या अधिकाऱ्यांनी दरवाजा तोडला, तिथे एक आरोपी लपला होता. त्यानंतर काही वेळातच त्याच परिसरात आणखी एक आरोपी लपून बसल्याचे पोलिसांना आढळून आले. दरम्यान गुन्हा घडल्यानंतर केवळ ८ तासात पोलिसांनी दहिसरच्या रावळपाडा परिसरातून धर्मेंद्र सुभाषचंद्र यादव व विकास गुलाबधर यादव या दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. धर्मेंद्र सुभाषचंद्र यादव व विकास गुलाबधर यादव हे दोघेही मूळचे बिहारचे रहिवाशी असून ते दहिसर परिसरात केटरिंग चे काम करत होते. त्यांच्या वडिलांनी कर्ज घेतले होते. ते कर्ज फेडण्यासाठी त्यांनी बँक लुटण्याचा बेत आखला. त्यासाठी त्यांनी युट्युब वर एक बँक लुटीचा व्हिडीओ पहिला. बँक लुटणे सोपे नाही, त्यासाठी पिस्तुल असणे गरजचे आहे. बँकेत गर्दी असते तसेच सुरक्षा रक्षक सुद्धा असतात . त्यांना धमकवण्यासाठी पिस्तुल हवी म्हणून त्यांनी दोन महिन्यांपूर्वी बिहार मधून एक पिस्तुल आणली. परंतु पिस्तुल चालवण्याचे कुठलेही प्रशिक्षण नव्हते. पण कर्ज फेडण्यासाठी या शिवाय दुसरा कुठलाही मार्ग नाही हे त्यांच्या लक्षात आले. दोघेही दहिसर परिसरात सुरक्षा रक्षक नसलेले बँक शोधू लागले. सुदयवाने त्यांना दहीसर स्टेशन जवळचे गुरुकुल बिल्डींगचे तळमजल्यावरील स्टेट बँक ऑफ इंडीयाची शाखा दिसली. २९ डिसेंबर रोजी दुपारी ३:३० वाजताच्या सुमारास तोंडाला मास्क आणि हातात पिस्तुल घेऊन बँकेत प्रवेश केला. बँक प्रवेशद्वाराजवळ संदेश गोमाणे नावाचा तरुण बसला होता. त्याला धमकवण्यासाठी धर्मेंद्रने पिस्तुल बाहेर काढले. त्यामुळे तो घाबरला. पिस्तुल चालवण्याचा कुठलाही अनुभव नसलेल्या धमेन्द्रच्या हातून धाक दाखवण्याच्या नादात पिस्तुल मधून गोळी झाडल्या गेली. यात संदेश जखमी होऊन ठार झाला. त्यानंतर बँकेतील कॅशिअरच्या कॅबिनमध्ये जाऊन त्याच्यावर पिस्तुल रोखून धरले. कॅशिअर घाबरला.त्याने हात वरती करताच या दोघांनी बँकेतील रोख रक्कम २ लाख ७० हजार रुपये घेऊन पळ काढला. पोलिसांनी तपास करून गुन्ह्यातील आरोपी धर्मेंद्र सुभाषचंद्र यादव व विकास गुलाबधर यादव या दोघांना ३० डिसेंबर रोजी अटक केली. त्याच्याकडून गुन्ह्यातील चोरुन नेलेली रक्कम रुपये २ लाख ७० हजार इतक्या रक्कमेपैकी २ लाख ५ हजार इतकी रक्कम हस्तगत करण्यात आली. तसेच गुन्हयात वापरलेले पिस्तुल ही जप्त करण्यात आले आहे. या दोघांना कोर्टात हजर केले असता ५ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. ही कामगिरी मुंबई पोलीस आयुक्त हेमंत नगराळे, सह आयुक्त (का. व सु.) विश्वास नांगरे पाटील, उत्तर प्रादेशिक विभाग अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीण पडवळ व परिमंडळ १२चे पोलीस उपायुक्त विशाल ठाकूर, दहिसर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त वसंत पिंगळे, बोरिवली विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्त रेखा भवरे यांच्या सह एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवी सरदेसाई, पो.नि. नागटिळक, पो.नि.मते, सपोनि शिरसाट, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउनि विजय धोत्रे, पोउनि रमेश वाघचौरे , दिपक पाटील तसेच परिमंडळ ११ मधील गोरेगाव पोलीस ठाण्याचे सपोनि संदिप पांचागणे, मालाड पोलीस ठाण्याचे पोउनि नागनाथ बनसोडे, मालवणी पोलीस ठाण्याचे पो.नि अर्जुन रजाणे, पोउनि संदिप वत्रे, बांगुरनगर पोलीस ठाण्याचे सपोनि डोईजड, चारकोप पोलीस ठाण्याचे सपोनि जिनपाल वाघमारे, कांदिवली पोलीस ठाण्याचे पो.नि विजय कांदळगावकर, पोउनि सागर भोकरे, बोरीवली पोलीस ठाण्याचे पो.नि. रविंद्र आव्हाड, पोउनि निलेश मोरे, दहिसर पोलीस ठाणेचे सपोनि ओम तोटावार, पोउनि विशाल राऊत, सपोनि अभिनव पवार, गोराई पोलीस ठाणेचे डॉ.दिपक हिंडे असे सर्वच पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार तसेच श्वान पथकातील प्रथम श्वान हस्तक सुरेखा भानूदास लोंढे, सहाय्यक श्वान हस्तक चंद्रकांत सर्जेराव महांगडे व श्वान 'जेसी' यांनी तपास करून उघडकीस आणला.

### शुल्लक कारणावरून निरपराधाची हत्या...

त्यामुळे काल्याची दहशत वाढली होती. काल्या भाईंच्या तोऱ्यात परिसरात वावरत होता. ऐकदिवशी शिवशक्ती सेवा संघ साई बाबा मंदिर येथील चाळीत राहणारा बबलू नावाचा इसम रस्त्याने जात होता. यावेळी काल्या आणि त्याचे मित्र मंगेश व सोनू हे दारू पित बसलेले होते. बबलू रस्त्याने जात असताना काल्या बबलूच्या पायावर थुकला. त्यामुळे संतप्त झालेल्या बबलुने काल्या आणि त्याच्या मित्रांशी वाद घालायला सुरुवात केली. बबलूला हे सर्व मारहाण करू लागले तेवढ्यात इब्राहिम तेथे आला. त्याने काल्याची समजूत काढली. बबलूला त्याच्या तावडीतून कसेबसे सोडवले. दुसऱ्या दिवशी परत काल्याने इब्राहिमचा मित्र मो. बरकत निसार अली यांच्या सोबत भांडण उकरून काढले. तेव्हा इब्राहिम हा त्याचा मोठा भाऊ मो.उमर फारुख शेख सोबत तेथे आला. तेथे या दोघा भावांनी काल्याच्या तावडीतून बरकत शेखची सुटका केली. प्रत्येक वेळेस इब्राहिम आणि त्याचा मोठा भाऊ उमर शेख हे दोघे मधात येत असल्याने काल्याला त्याचा राग आला. 'ईद होणे के बाद तुम्हारी भी विकेट निकलेंगे' असे म्हणत काल्याने या भावंडांना धमकी दिली. मात्र त्याच्या धमकीकडे फारसे कोणी लक्ष दिले नाही. ते दोघेही भावंड आपल्या कामात व्यस्त असल्याने त्यांनी काल्याकडे दुर्लक्ष केले. मात्र काल्या आणि त्याचे मित्र या दोघा भावंडाच्या पाळतीवर होते. मंगेश हा कल्याचा फंटर होता. तो सर्व माहिती काल्याला पुरवत होता. इब्राहिम आणि उमर फारूक कुठं एकटे भेटणार याची ते वाट पाहत होते. दुर्दैवाने तो दिवस उजाडला. तो दिवस होता ३१ जुलै २०१४चा. त्यादिवशी ईदचा सण असल्याने उमर फारुख याला सुट्टी होती. तो सणा निमित्ताने घरी होता. सायंकाळी ७:१५ च्या सुमारास तो राहत असलेल्या गोवंडी येथील न्यू गौतमनगर, प्लॅट नंबर ७, हनुमान मंदिराजवळ फिरत फिरत आला असता, काल्या आणि त्याचे फंटर मित्र सोनू सूद, मंगेश बंड व मोसीन शेख या चौघांनी त्याला रस्त्यात गाठलं. फारुख उमर शेख याला रस्त्यावर अडवून तू परिसरात भाईगिरी करायला लागला. आता तुझा माज उतरवतो असे म्हणत, या चौघांनी त्याचे हात पकडून लाथाबुक्यांनी मारहाण करायला सुरुवात केली. तो एकटा असल्याने या चौघांचा प्रतिकार करू शकला नाही. याच वेळी काल्याने आपल्या जवळील धारदार चाकू काढला. चाकूने फारूखच्या पोट, चेहरा, मानेवर वार केले. डाव्या बरगडीला चाकूचा मार लागल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळला. ही माहिती फारुखची बहीण सुबेदा शेख ही धावत रडत घरी आली. तिने भाऊ इब्राहिम याला काळ्या आणि त्याचे मित्र फारुखला मारहण करीत असल्याचे सांगितले. तसाच इब्राहिम बहिणीसह धावत त्या ठिकाणी पोहचला. त्यावेळी काल्या आणि त्याचे मित्र फारुखला मारहाण करीत होते. इब्राहिमने आरडाओरडा करून मदतीसाठी याचना केली असता, काही मित्र मदतीला धावले. तेव्हा ते चौघेही पळून गेले. जखमी उमर फारुख याला तातडीने घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्यास रात्री ८:१५ च्या सुमारास मृत घोषित केले. या घटनेची माहिती रुग्णालयातून देवनार पोलीसांना देण्यात आली. देवनारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर विचारे, पोलीस निरीक्षक गुलाबराव पाटील, सपोनि अनिल गायकवाड, संतोष नरुटे, पोलीस उप निरीक्षक निलेश शेवाळे, सहा पोलीस उप नि. अशोक भगत, पो हवा. कानडे, जाधव, शेख, सावंत इत्यादी रुग्णालयात दाखल झाले. मृतक मो. उमर फारुख अबूबकर शेख याच्या प्रेताची बारकाईने पाहणी करून पंचनामा केला. तसेच घटनास्थळी भेट देऊन तेथील जागेची पाहणी केली. तसेच मृतक उमर फारुख चा भाऊ इब्राहिम शेख याच्या फिर्यादी वरून आरोपी विरोधात गु.र.क्र.१८६/२०१४ कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस उपायुक्त संग्रामसिंग निशानदार यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास करून पोलिसांनी काळ्या जैस्वाल, सोनू सूद, मंगेश बंड व मोसीन शेख या चौघांना अटक केली. तपास अधिकारी अनिल गायकवाड यांनी या गुन्हाचा तपास करून या आरोपीच्या विरोधात मुंबई सत्र न्यायालयात वेळेवर आरोपपत्र दाखल केले. सात वर्षे या खटल्याचे कामकाज चालले. अखेर १० ऑक्टोबर २०२१ रोजी मुंबई सत्र न्यायालयाचे न्या. व्ही.बी. वाघ यांनी या गुन्ह्यातील ४५ साक्षीदार तपासून आरोपी काल्या जैस्वाल, सोनू सूद, मोसीन शेख व मंगेश बंड या चौघांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. यातील काळ्या जैस्वाल हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यवर २६ गुन्हे दाखल आहेत. सोनुवर २४, तर मोसीन वर ३ गुन्हे दाखल आहेत. आरोपी ची गुन्हेगारी पार्श्वभूमी पाहता मा.न्यायालयाने कुठंलीही दया न दाखवता या चौघांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. सरकारी पक्षातर्फे पाटील मॅडम यांनी काम पाहिलं. सध्या हे चार ही आरोपी तुरुंगात खाडी फोडत आहे. तर मूतक उमर फारुख शेखच्या कुटुंबियांनी न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करून समाधान व्यक्त केले आहे.

# भिवंडीत हजारो प्रेक्षकांची उपस्थित चाले रात्रीचे हुतूतू सामने; मात्र पोलिसांना याची खबरच नाही



**भिवंडी/प्रतिनिधी**

कोरोनासह ओमायक्रोनचा धोका वाढल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून तिसरी लाट रोखण्याचे प्रयत्न सुरु केले. त्यानुसार पुन्हा कोरोना नियमांवली नव्याने जाहीर करीत रात्रीची संचारबंदी लागू केली. त्यातच भिवंडी पालिका प्रशासनाकडून बंदिस्त प्रेक्षागृहात महापौर चषक कबड्डीचे आयोजन केले.विशेष म्हणजे संचारबंदी असताना मध्यरात्रीपर्यत हुतूतू सामने हजारो प्रेक्षकांच्या उपस्थित सुरु आहेत. मात्र या सामन्याची पोलिसांना खबरच नसल्याने याठिकाणी कोरोना नियमावली पायदळी तुडवत सोशल डिस्टंसिंगचा पुरता फज्जा उडाला आहे. ज्या महापालिकेकडे कोरोना रोखण्याची जबाबदारी आहे. त्याच प्रशासनाकडून कोरोनाच्या तिसऱ्या लाटेला निमंत्रण दिले काय? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. महाराष्ट्रासह देशात कोरोनाची तिसऱ्या लाटेची शक्यता असताना राज्यात सरकराने कोरोना नियमावली जाहीर केली आहे. त्यातच ओमायक्रोनचा धोकाही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तर दुसरीकडे नवीन वर्षाच्या निमित्ताने गर्दी होऊ नये यासाठी राज्यसरकारने रात्री ९ ते सकाळी ६ वाजेपर्यत संचारबंदी घोषित केली आहे. संचारबंदीत एका ठिकाणी ५ पेक्षा अधिक नागरिक एकत्र येऊ शकणार नाही. यावर लक्ष ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाला आदेश काढण्यात आले. जेणेकरून कोरोना सारख्या महाभयंकर आजाराला आळा घालता येईल. परंतु राज्य सरकारने दिलेल्या सर्व नियमांचे उल्लंघन करत भिवंडी महानगरपालिका अंतर्गत एका बंदिस्त प्रेक्षागृहामध्ये बिनधास्तपणे मध्यरात्रीच्या उशिरापर्यत महापौर चषक कबड्डीचे आयोजन करण्यात आले आहे. या कबड्डी स्पर्धेत मोठ्या संख्येने गर्दी होत असल्याने सोशल डिस्टंसिंगचा फज्जा उडाला, तर कुणाच्या चेहऱ्यावरचा मास्क देखील नव्हता. विशेष म्हणजे ही स्पर्धा बंदिस्त प्रेक्षाकगृहात अर्धा शटर बंद करून सुरू होते. शिवाय याचे लाईव्ह चित्रीकरण थेट युट्युबच्या माध्यमातून दाखवले देखील जात होते. मौलाना अब्दुल कलाम आज़ाद स्पोर्ट्स क्लबच्या वतीने कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली असून कोरोना नियमांची पायमल्ली या स्पर्धेत होत आहे. दुसरीकडे पोलिसांचे म्हणणे आहे की, पाच पेक्षा अधिक लोक एकत्र दिसले तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

नवीन वर्ष घरात साजरे करा असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे. मात्र भिवंडी-निजामपूर शहर महापालिकेच्या बंदिस्त प्रेक्षागृहात बिनधास्तपणे मध्यरात्री नंतर देखील हजारोच्या गर्दीमध्ये महापौर चषक कबड्डीचे आयोजन धूमधडाक्यात सुरू आहे. असे असताना पोलीस कारवाई का करत नाही? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे.

# जे.जे. रुग्णालयाच्या डॉ. कल्याण मुंडे यांचा अमित देशमुखांच्या हस्ते सत्कार



**मुंबई/प्रतिनिधी**

दोन महिन्याच्या बाळाच्या ह्दयाला असलेल्या छिद्रावर यशस्वी शस्त्रक्रिया करुन या लहानग्याला जीवनदान देणाऱ्या जे. जे. रुग्णालयाच्या कॉर्डिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. कल्याण मुंडे यांचा आज वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांनी मंत्रालयात पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. कर्नाटकच्या गुलबर्गा येथील रहिवाशी आणि मुंबईत रोजगारासाठी आलेल्या राहुल राठोड यांच्या दोन महिन्याच्या लहान मुलाला श्र्वास घेण्यास त्रास आणि पुरेशी झोप येत नसल्याचे निदर्शनास आले, त्यानंतर त्यांनी गुलबर्गा येथील रुग्णालयात या बाळाच्या चाचण्या केल्या त्यावेळी या बाळाच्या ह्दयाला ६ मि.मि. आकाराचे छिद्र असल्याचे निदर्शनास आले. काही डॉक्टरांशी संपर्क केल्यानंतर ह्दयाचा आकार लहान असल्यामुळे शस्त्रक्रिया करण्यास अडचण असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्यावर राठोड यांनी जे. जे. रुग्णालयात जाऊन डॉ. मुंडे यांच्याशी संपर्क साधला. खुली शस्त्रक्रिया न करता त्यांनी ट्रान्सकॅथेटर प्रक्रिया राबवून ही यशस्वी शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेनंतर बाळाच्या प्रकृतीत सुधारणा होत असून बाळाचा आहार आणि झोप व्यवस्थित होत असल्याचे दिसून आले आहे. डॉ. कल्याण मुंडे यांनी या अवघड शस्त्रकिया यशस्वी करुन बाळाला नवजीवन दिल्याबद्दल मंत्रालयात वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांनी डॉ. मुंडे यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव सौरभ विजय, वैद्यकीय शिक्षण आयुक्त वीरेंद्र सिंह, संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, सहसंचालक डॉ. अजय चंदनवाले, उपसचिव प्रकाश सुरवसे, पत्रकार अमेय तिरोडकर, मंगेश चिवटे, दीपक कैतके आदी उपस्थित होते.

# पोलीस निरीक्षक कुलकर्णी यांच्या सतर्कतेमुळे वाचले पाच जणांचे जीव



**सोलापूर/प्रतिनिधी**

अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांच्या सतर्कतेमुळे व अन्य पोलीस सहकारी यांच्या प्रयत्नामुळे पाच जणांचे जीव वाचविण्यात यश आले आहे. सोमवारी अक्कलकोट वागदरी रस्त्यावर रात्री साडे नऊ च्या सुमाराला शिरवळवाडी पासून दोन किमी अंतरावर ही घटना घडलेली आहे. भरधाव वेगाने जाणाऱ्या सिमेंट बल्कर गाडी चालकाला गाडीवरील ताबा सुटल्याने रोडलगत असलेल्या खड्ड्यात ही गाडी उलटली. यामध्ये पाचजण अडकले होते. अपघातानंतर आरडाओरडा सुरू होती. त्यानंतर प्रत्यक्षदर्शीने डायल ११२ वरून रात्री पावणेदहाच्या सुमारास कॉल केला पंधरा ते वीस मिनिटात पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि सोबत अंमलदार व शेजारील गावातील पंचवीस ते तीस लोकांना बोलावून मदतीसाठी पुढे गेले. त्यांच्या मदतीने तब्बल तीन ते साडेतीन तास शर्थीचे प्रयत्न सुरु करून रात्री एकच्या सुमारास या सर्वाना बाहेर काढले. यात एक ५० वर्षाचा इसम, ३० वर्षाच्या महिला, १४ वर्षाचा मुलगा, १३ वर्षाची मुलगी, एक चालक अशा पाच व्यक्तींचे प्राण वाचवून बाहेर काढले. या घटनेत कुणाचा पाय अडकलेला होता, तर कुणाचा हात असे अत्यंत गंभीर परिस्थितीत जेसीबी क्रेन व एक हायड्रा वाहन मागवले गाडीत अडकलेल्या पाच व्यक्तींना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. या ठिकाणी यांच्या मदतीला सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश भावीकट्टी, फौजदार मुजावर, व्यंकटेश सुतार, हवालदार विपिन सुरवसे राम चौधरी, बशीर शेख, अनिल चव्हाण, गजानन शिंदे, सतीश रावले, लिंगय्या स्वामी, रणजित अवताडे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# ग्रामपंचायत कर्मचारी करणार धरणे आंदोलन



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या वतीने १ जानेवारी २०२२ रोजी विविध प्रलंबित मागण्यांसाठी कोल्हापूर येथील बिंदू चौक येथून बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याचे निवेदन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांना निवेदन देण्यात आले आहे. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या अनेक आर्थिक मागण्या शासन, प्रशासनाकडे प्रलंबित असून तालुका आणि जिल्हा स्तरावरील काही शासनमान्य मागण्या अंमलबजावणीस्तव प्रलंबित आहेत. राहणीमान भत्ताची अदाई, भविष्य निर्वाह निधीचे खाते अद्यावत करणे, ज्या ठिकाणी सेवा पुस्तिका अद्यावत नाहीत. तेथील सेवा पुस्तिका अद्यावत करणे, अशा विविध अन्य मागण्या शासनाकडे प्रलंबित असून वारंवार मागणी करूनही मागण्या मान्य करण्यात आल्या नाहीत. शासन स्तरावरील प्रलंबित मागण्या मंजूर व्हाव्यात म्हणून सोलापूर जिल्हा ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या वतीने एक जानेवारीपासून कोल्हापूर येथे बेमुदत आंदोलन करण्यात येणार आहे. ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांचे लक्ष वेधण्यासाठी संघटनेला आंदोलन करावे लागत असल्याचे सीईओ स्वामी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी हुवप्पा पुजारी, रशीद जमादार, सतिश गायकवाड, अजित लंगडे, नवनाथ लंगडे अधिक कर्मचारी उपस्थित होते.

# रस्त्यात सापडलेली दागिन्यांची बॅग लातूर पोलिसांनी मालकासकेली परत!



**लातूर/करकरे अंबादास**

दिनांक २८/१२/२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, लातूर येथील पोलीस अंमलदार राजाभाऊ मस्के, माधव बिल्लापटे, नितीन कटारे हे एका गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेत गांधी चौक परिसरात फिरत होते. तेव्हा त्यांना रस्त्यावर एक बेवारस बॅग पडलेली दिसली. ती बॅग उघडून पाहिली असता त्यामध्ये सोन्या-चांदीचे दागिने व काही कागदपत्र दिसून आली. नमूद अंमलदारांनी सदरची माहिती पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक अनुराग जैन, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक गजानन भातलवंडे यांना दिली. पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे यांच्या निर्देशांन्वये सदरच्या कागदपत्रांवरून बॅगच्या मूळ मालकाचा शोध घेण्यात आला. तेव्हा ती बॅग दादोजी कोंडदेव नगर, लातूर येथे राहणारे राजू प्रभाकर वेदपाठक यांची असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून त्यांना संपर्क साधून पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावून घेण्यात आले. राजू वेदपाठक यांनी सांगितले की, आज सकाळी काही कामानिमित्त मी गंजगोलाई कडे गेलो होतो. माझ्या मोटार सायकलला लावलेली बॅग त्यामध्ये ०४ जोडी सोन्याचे फुले, ०६ चांदीचे करंडे, ०९ चांदीची कमळे, जोडवे-बीचवे, वाळे आणि सोन्याचा चुरा असा ६० हजार रुपयाच्या चीजवस्तू असलेली बॅग रस्त्यात हरवली होती असे सांगितले. अप्पर पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांचे हस्ते सदरची बॅग मूळ मालक राजू वेदपाठक यांना परत देण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार यांचे प्रमाणिकपणा बद्दल वरिष्ठांनी कौतुक केले आहे.

# बोरोळ येथील विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या; चौघांवर गुन्हा दाखल

**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे बोरोळ येथील विवाहिता आश्वीनी रमेश म्हेत्रे वय २८ वर्ष हिने २९ डिसेंबर रोजी सासरच्या जाचास कंटाळून गळफास घेऊन अत्महत्या केल्या प्रकरणी चौघावर गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी १ रमेश जगनाथ म्हेत्रे (नवरा), लक्ष्मीबाई जगनाथ म्हेत्रे (सासु), जगनाथ म्हेत्रे (सासरा), ४ गणेश जगनाथ म्हेत्रे (दिर) सर्व राहणार बोरोळ वरील अरोपीनी संगनमत करून विवाहितेला माहेरवुन पाच तोळे सोने घेऊन ये म्हणून शारीरिक व मानसिक छळ करून जाचजुलुम केल्याने अश्वीनी रमेश म्हेत्रे या विवाहितेला अत्महत्या करण्यास पृवृत्त केल्या प्रकरणी बाबुराव मनोहर कोरे रा.अनंदवाडी ता.निलंगा यांच्या फिर्यादीवरुन देवणी पोलीसात गु.र.न.३६९/२१ कलम ३०६,४९८ अ ३२३,५०४,३४ खझउ नुसार वरील अरोपींवर गुन्हा दाखल झाला असुन अरोपीना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक गणेश सोंडारे हे स्वतः करीत आहेत, अशी माहिती देण्यात आली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंसाठी अर्ज

**पालघर/प्रतिनिधी**

अनूसुचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक ती रक्कम संबंधित विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट उपलब्ध करण्यासाठी शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु केलेली आहे. ज्या विद्यार्थ्याचा सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश झालेला नाही अशा विद्यार्थ्यांना सदर योजनेतंर्गत सन २०२०-२१ व २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता अर्ज करणेसाठी या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना https://mahaeschol.maharashtra.gov.in,https://sjsa maha rashtra.gov.in https://maharashtra.gov.in या संकेत स्थळावरुन Download करुन किंवा सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातुन विद्यार्थ्यास उपलब्ध होईल. या योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पालघर या कार्यालयातर्फे करण्यात येत आहे.

# प.स.सभापती गंगासागरबाई जाभाडे यांच्या पुढाकारातून ३१ शाळांना स्वच्छ पाण्यासाठी आरओ फिल्टर मंजुर!

**अहमदपूर/फिरोज शेख**




तालूक्यातील जिल्हापरिषदेच्या ३१ शाळांना पंचायत समितीच्या सभापती गंगासागरबाई जाभाडे यांच्या पुढाकारातून विद्यार्थांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पूरवठा होण्यासाठी आरओ फिल्टर मंजूर केले असून ते आरओ फिल्टर या ३१ शाळांना बसविण्यात येत आहेत. येथील पंचायत समितीच्या वतीने पंधरावा वित्त आयोग निधीतून तालूक्यातील जि.प.प्रशाला शिंदगी खू., मांगदरी, शिंदगी बू., ब्रम्हवाडी, वरवटी, वरवटीतांडा, गूगदळ, उजना, पेमातांडा, थावरातांडा, तूळशीरामतांडा, वडारवाडी, पिंकूतांडा, राळगातांडा, रूद्दा, मावलगाव, लांजी, हागदळ, येस्तार, अहमदपूर, रुई दक्षिण, रूई उत्तर, राळगा, गूट्टेवाडी, नरवटवाडी, कावळवाडी, पार, येलदरवाडी ,सूनेगांव, सोरा, चिल्का आदी गावांच्या शाळांचा समावेश आहे. दि. ३० रोजी येथील राळगा तांडा येथे झालेल्या एका कार्यक्रमात या आरओ फिल्टरचे लोकार्पण करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बी.एन.शिंदे हे होते तर प्रमुख पाहूणे म्हणून प्रशांत जाभाडे, सरपंच राजकुमार नरवटे, मुख्याध्यापक मनोहर घोगरे, साधनव्यक्ती गणेश जाधव, प्रभाकर चव्हाण, उत्तम आडे, सोमाजी चव्हाण आदींची उपस्थिती होती.

## थोडक्यात वृत्तांत

### पीकविम्यासाठी शिवसेनेचा आंदोलनाचा इशारा

रेणापूर : प्रधानमंत्री बीमा फसल योजनेअंतर्गत २०२१ सालचा खरीप हंगामात सोयाबीनचा पीकविमा मिळण्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ भरपाईची रक्कम मिळावी अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन केले जाईल,असा इशारा शिवसेना उपजिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी दिला आहे. २०२१साली खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री बिमा फसल योजनेअंतर्गत कंपनीकडे पैसे भरलेले होते. नुकसान झाल्यानंतर कंपनीकडून त्याची भरपाई मिळणे आवश्यक होते.परंतु ती न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांनी वारंवार अर्ज व तक्रारीही केल्या. तरीदेखील हजारो शेतकरी विमाभरपाई मिळण्यापासून वंचित राहिले. शिवसेना उपजिल्हाप्रमुख दाने यांनी विमा कंपनीचे जिल्हा समन्वयक संतोष भोसले यांची भेट घेऊन शेतकर्यांच्या वतीने मागण्यांचे निवेदन सादर केले. शेतकऱ्यांना भरपाईची रक्कम तात्काळ देण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी चैतन्य होळकर, काळे, विकास पवार, भगवान शिंदे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. शेतकऱ्यांना भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू. आगामी १५ दिवसात भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करू, असे आश्वासन जिल्हा समन्वयक संतोष भोसले यांनी सचिन दाने यांना यावेळी बोलताना दिले.

### देवणी येथील उमेश घाटगे यांचे निधन



देवणीः देवणी येथील उमेश प्रभाकरराव घाटगे वय ४५ वर्षे यांचे बुधवार दि.२९ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर देवणी येथील सार्वजनिक स्मशान भूमीमध्ये बुधवारी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, एक भाऊ, चार बहिणी असा परिवार आहे. पत्रकार बाळासाहेब घाटगे यांचे ते बंधू होत.

### पल्स पोलिओ मोहिम यशस्वी करावी!

लातूर : जगातून पोलिओचे निर्मुलन करणेसाठी सन १९९५ पासून पल्स पोलिओ मोहिम राबविली जाते. यात नियमित लसीकरण, पोलिओ संक्षयीत रुग्णांची तपासणी करणे व पल्स पोलिओ मोहिम यशस्वीपणे राबविणे आवश्यक आहे. याच अनुषंगाने २३ जानेवारी २०२२ रोजी जिल्ह्यात सर्वत्र पल्स पोलिओ मोहिम राबविली जाणार आहे. त्या अनुषंगाने जिल्हा कृती दलाची बैठक ३० डिसेंबर २०२१ रोजी आयोजित केली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी पल्स पोलिओ मोहिम यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. लातूर जिल्ह्यात २ लाख ७२ हजार ५६९ हे ०५ वर्षे वयोगटातील लाभार्थी असून एकूण २ हजार १२८ बूथचे नियोजन केले आहे. यात ९ हजार ६६१ कर्मचारी यांची नियुक्ती केली असून ४३० पर्यवेक्षकांची नेमणूक केली आहे.तालूका निहाय जिल्हास्तरीय अधिकारी यांची नेमणूक करुन संनियंत्राची जबाबदारी दिली. या मोहिमेत एकही लाभार्थी वंचीत राहू नये यासाठी नियोजन करण्याची सूचनाही यावेळी जिल्हाधिकारी यांनी केल्या. लातूर जिल्ह्यातील उसतोड ठिकाणी, विटभट्टया, स्थलांतरीत समुह, बांधकाम ठिकाणी लाभार्थींची आगावू नोंदणी करुन सर्व सनियंत्रण अधिकारी यांनी व्यक्तीशः लक्ष देणेबाबत सूचीत करण्यात आले आहे. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, मनपाचे आयुक्त अमन मित्तल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एच.व्ही. वडगावे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. देशमुख, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. अर्चना पंडगे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हरिदास, आयएमए च्या डॉ. काळे, अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख व सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिक्षक व जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

### गांधीतीर्थतर्फे नववर्ष स्वागतार्थ पीसवॉक

जळगावः मानवी जीवनात सुदृढ आरोग्य व मनःशांतीला विशेष महत्व आहे. कोरोनाच्या कालखंडाने हि गोष्ट अधोरेखित केली आहे. गांधी रिसर्च फाऊंडेशनने याच उद्देशाने नवीन वर्षाची सुरुवात १जानेवारी २०२२ 'पीस वॉक'ने करावी यासाठीचे नियोजन केले आहे. जैन हिल्सच्या शांत, प्रसन्न आणि निसर्गरम्य वातावरणात हा पीस वॉक होईल. मानवी जीवन आणि पंचमहाभूते यात अद्वैताचे नाते आहे. मानवी शरीर या पंचमहाभूतांनी बनलेले आहे. एक तासाच्या या पीस वॉकमध्ये आपण हा संबंध समजून घेणार आहोत. त्यामुळे नवीन वर्षात जीवनाकडे पाहावयाचा दृष्टिकोन आपणास लाभेल. डॉ. अश्विन झाला पीस वॉकचे निरुपण करणार आहेत. अधिक माहितीसाठी गिरीश कुळकर्णी यांचेशी ९८२३३३४०८४ या क्रमांकावर संपर्क करावा.

### कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेच्या अंमलबजावणीला सुरुवात

लातूर : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. १४ ऑगस्ट २०१८ शासन निर्णयान्वये कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील दारिद्रय रेषेखालील भूमिहीन शेतमजुर, विधवा महिला, परितक्त्या महिला, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याअंतर्गत पिडीत लाभार्थी यांचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढून त्यांचे राहणीमानाचा दर्जा सुधारावा. यासाठी १०० टक्के अनुदानावर ०४ एकर कोरडवाहू जमीन किंवा ०२ एकर बागायती जमीन लाभार्थ्यांस उपलब्ध करुन देण्यात येते. या योजनेतील पात्र लाभार्थी यांना सदरील योजनेचा लाभ देणेसाठी सन २०२१-२०२२ मधील शासकीय रेडिरेकनरच्या दराप्रमाणे जमिन खरेदी करावयाची असल्याने लातूर जिल्हयातील ज्या शेतकऱ्यांना सन २०२१-२०२२ मधील शासकीय रेडिरेकनर दराप्रमाणे त्यांचे वैयक्तिक संयुक्त मालकीची शेतजमीन सामाजिक न्याय विभागास विक्री करावयाची आहे. अशा शेतकऱ्यांनी कार्यालयीन वेळेत सहायक आयुक्त, समाज कल्याण, लातूर यांचे कार्यालयात लेखी अर्ज सादर करावा.

# २०२२चे भवितव्य काय?

प्रत्येक माणूस हा आशेवर जगत असतो. त्याला नेहमी वाटतं असते की आज आपली परिस्थिती सुधारली किंवा आज काय मिळाले नाही तर उद्या नक्कीच मिळेल. त्यामुळे येणारा प्रत्येक दिवस, महिना किंवा वर्ष हे त्याच्यासाठी आशेचा किरण असते आणि म्हणूनच तो प्रत्येक वर्षाचे जल्लोषात स्वागत गरित असतो. २0२0 मध्ये कोरोनाने माणसाला पार उध्वस्त करून टाकले. तरीही त्याने पूर्वीच्याच उत्साहात २०२१ चे स्वागत केले होते आणि २०२१ मध्येही फार काही चांगली स्थिती नसताना सुद्धा तितक्याच उत्साहात २०२२ चे स्वागत केले. पण सरत्या वर्षाला दरवर्षीप्रमाणे निरोप देता आला नाही. अर्थात जमावबंदी असल्याने व हॉटेल, बार रेस्टॉरंट, पब, रिसॉर्ट हे सगळ बंद असल्याने थर्टी फर्स्टच्या पार्ट्या झाल्या नाहीत. तळीराम जे आहेत त्यांचे वांदे झाले खरे, पण थर्टी फर्स्टच्या पार्ट्याऐवजी त्यांनी घरात बसूनच पिणे पसंत केले. पण त्यासाठी वाइन शॉपच्या समोर मोठ्या रांगा लागल्या होत्या. जशी रेशनसाठी रांग लागतात तशा दारुसाठी रांगा लागल्या होत्या. लोकांनी आता कोरोनाशी जुळवून घेतले आहे आणि शेवटी माणूस किती दिवस कोरोनाच्या भीतीने लपून बसणार? जगण्यासाठी त्याला हातपाय हलवावे लागणारच ना! मोदींनी प्रत्येकांच्या खात्यात टाकलेले १५ लाख सुद्धा संपले. त्यामुळे आता पुढे करायचे काय हाच प्रश्न आहे. कोरोना आटोक्यात आला होता, पण आंदोलने, मेळावे, नेत्यांच्या मुलाबाळांची लग्न, जन आशीर्वाद यात्रा, निवडणुकीतील प्रचाराच्या निमित्ताने होणारी गर्दी मग का नाही कोरोना वाढणार? आता कुणी काही म्हणो कोरोना ज्या पद्धतीने वाढतोय ते पाहता मार्च २0२0 सारखीच किंवा त्याही पेक्षा भयानक स्थिती या २०२२ मध्ये उद्भवणार आहे. त्यामुळे हे वर्ष म्हणजे लोकांसाठी कसोटीचा काळ असेल एवढं मात्र नक्की आहे. या वर्षांत लोकांसमोर नियतीने काय वाढून ठेवले आहे ते त्या परमेश्वरालाच ठाऊक. पण मागील दोन वर्षांत माणसाच्या जे वाट्याला आले आहे त्याने माणूस खचला आहे. आर्थिक आणि मानसिक दृष्ट्या त्याची अवस्था खूप वाईट झाली आहे. अशावेळी निदान २०२२ हे वर्ष तरी सुखाचे जावो अशीच तो ईश्वराला प्रार्थना करतोय. आशेला कर्तुत्वाची जोड देऊन देवाच्या कृपेची अभिलाषा बाळगणाऱ्या माणसाच्या पदरी गेल्या दोन वर्षात घोर निराशा पडली. कारण कोरोनाने होत्याचे नव्हते केले. एकट्या महाराष्ट्रात कोरोनाने दिड लाख माणसे मेली. त्यामुळे जगातल्या संपूर्ण मानव जातीनेच कोरोनाचा धसका घेतलेला आहे. तरीही माणूस जगण्याची धडपड करतोय. २०२१ सालातले शेवटचे काही दिवस पुढील संकटांची चाहूल देऊन गेले, कारण मावळत्या वर्षाच्या शेवटच्या एका आठवड्यात तब्बल ८ हजार नावे कोरोना बाधित सापडले, तर ओमिक्रोनचे ४५0 रुग्ण सापडले ही आकडेवारी पाहिल्यानंतर भविष्यात आणखी कोणत्या संकटाचा मुकाबला करावा लागणार याच चिंतेत माणूस आहे. मात्र त्याही स्थितीत माणसाने नेहमीप्रमाणेच हर्षोउल्लासात नव वर्षाचे स्वागत केले आहे. या वर्षात आरोग्य विषयक संकटाच्या बरोबरच आर्थिक संकटाचा सुद्धा सामना करावा लागतोय. कारण मागील दीड वर्षांपासून उद्योग धंदे बंद होते. त्यामुळे सरकारच मोठ महसुली नुकसान झालंय. एकीकडे महसूल बुडतो, तर दुसरीकडे कोरोनामुळे खर्च वाढतोय. या दोन्हींचा ताळमेळ घालणे अशक्य झाले आहे. म्हणूनच या वर्षात तरी कोरोनाचे संकट दूर व्हायला हवे. अन्यथा जगणे मुश्कील होईल. कारण या नव्या वर्षात माणसाने खूप काही संकल्प केले आहेत. कुणाला नवा उद्योग सुरू करायचा आहे. कुणाला लग्नकार्य करायचं आहे, तर कुणाला नवे घर घ्यायचे आहे. पण हे सगळ तेंव्हाच शक्य आहे. जेंव्हा सर्व काही सुरळीत सुरू असेल, पण जर कोरोनाचे हे संकट असेच राहिले, तर मात्र केलेल्या संकल्पांवर पाणी फिरले जाईल आणि या वर्षीसुद्धा लोकांच्या पदरी निराशा पडेल. अर्थात कोरोना पासून मुक्ती मिळवायची असेल तर लोकांनीही जबाबदारीने वागायला हवे. सरकारने जे निर्बंध घातले आहेत ते पाळायला हवेत. तरच या संकटातून मुक्ती मिळेल. हे निवडणुकांचे वर्ष आहे. या वर्षात उत्तर प्रदेशसह पाच राज्यांच्या निवडणुका आहेत. शिवाय महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, यासारख्या मोठ्या शहरांसह १८ महापालिकांच्या निवडणुका आहेत. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाने महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग अडवला आहे. अशावेळी पुढे काय होणार याकडे सर्व ओबीसी समाजाचे लक्ष लागलेले आहे. महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक निदान या वर्षात तरी येईल आणि इथल्या औद्योगिक विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा होती. पण कोरोनाने पुन्हा चिंता वाढवलेली आहे. खास करून जे छोटे उद्योग धंदे आहे त्यांची बिकट अवस्था आहे. केंद्रातील भाजपा सरकार मदत करायला तयार आहे. पण त्यांची मदत सावकारी मदत आहे. ती घेऊन तरी काय उपयोग कोरोनाच्या काळात केंद्र सरकारने जी तीन मोठी मदत पॅकेजेस जनतेसाठी जाहीर केली. ती मदत नव्हती तर मदतीच्या नावाखाली दिलेले कर्ज होते. या वर्षीजर पुन्हा कोरोनाचे संकट वाढले, तर पुन्हा केंद्र सरकारं मदत जाहीर करील यावेळी कदाचित व्याज कमी असेल. पण संकटाच्या काळात जर अशा तऱ्हेने सरकार कडून लोकांची थट्टा होऊ लागली, तर लोक गप्प बसणार नाहीत. नव्या वर्षाचं लोकांनी स्वागत तर केले आहे, पण या वर्षीही संकटाशी संघर्ष करावा लागणार हे मात्र नक्की!

# लातूर जिल्ह्याच्या परंपरेतला शेत महोत्सव येळवस!!

लातूर जिल्हा आणि जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात येत्या रविवार, दि.२ जानेवारी रोजी समुद्राला जशी, पाण्याची भरती येते... तशी शेताशेतात माणसाची, भरती येते... कोणत्याही पुरानात किंवा इतिहासात नसलेला मात्र शेकडो वर्षाची परंपरा असलेला एक सण म्हणजे येळवस म्हणजे वेळाआमावस्या... हा सण हिरवाईचा अपूर्व सोहळा... २ जानेवारी रोजी अख्ख्या लातूर जिल्ह्यातील शेतात भरेल, यावेळी कोरोनाचे संकट आहे, त्यामुळे प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना जाहीर केल्या आहेत, त्या सांभाळून वेळाआमावस्या साजरी होईल. त्या विषयी महाराष्ट्राला समजावे म्हणून हा लेख प्रपंच!!

**कसा असतो सोहळा!!**

वेळाआमावस्या चार दिवस अगोदर साधनाची जमवा-जमव सुरु होते. त्यात तुरीच्या शेंगा, चवळी, भुईमूग हा सगळा रानमेवा जमा होतो...आणि वेळाआमावस्या



पहाटे घराघरात चूल पेटते... बेसनपिठात कालवून चिंच आणि अंबिवलेल्या ताकाच्या पाण्यात वर उल्लेखलेले उकडलेले पदार्थासह शिजवलेली भाजी... म्हणजे भज्जी... ही भज्जी म्हणजे अफलातून भाजी, मी आजपर्यंत राज्याच्या कानाकोपऱ्यात फिरलो, वेगवेगळे पदार्थ खाले पण भज्जीसारखी अफलातून चव कशाला म्हणजे कशाला नाही ...या डीशची तुलना कोणतेही पंचतारंकित हॉटेलही करु शकणार नाही. या बरोबर दिले जाणारे अंबील म्हणजे तर राज दरबारी असलेले सगळे पेय फिके पडावेत असे...चार दिवसाचे ताक ज्वारीच्या पिठात अंबवून जिरा फोडणी दिलेल हे पेय जे तांब्यावर तांबे रिचवले तरी प्यायची इच्छा होते ते अंबिल ( काही जणांचे तोंडही सुजतात दुसऱ्या दिवशी जादाचा डोस झाल्यामुळे). भल्या थोरल्या भाकरी...... गव्हाची खीर एका शेतात २० ते २५ लोक जेवतील एवढा स्वयंपाक वाजत गाजत घरातून डोक्यावरुन शेतावर निघतो. एका शेतात खाल्लेली येळवस दुसऱ्या शेतात जाऊन खाण्यासाठी ते जिरावं म्हणून प्रत्येक कोपीच्या पुढे झोका बांधला जातो...!!

**काय आहे परंपरा!**

भारतीय व्दिपकल्पात सिंधु संस्कृती पासून नदीचे जल पुजन करण्याची परंपरा चालत आलेली आहे. गंगा, यमुना, गोदावरी, सरस्वती, नर्मदा, सिंधु आणि कावेरी या त्या सात नद्या (सप्त सिंधु) भारतीय लोक परंपरेत अतिशय पवित्र समजल्या जातात. त्यामागे त्यांच्या प्रती असलेली कृतज्ञता होती. त्याच सप्तसिंदु मातृका म्हणून पुजण्याची परंपरा सुरु झाली. पुढे पिण्याच्या पाण्याच्या विहिरी खोदल्यानंतर त्यातले जल हे या सप्त सिंधुचे प्रतिक म्हणून पुजल्या जावू लागले. विहिरीच्या जवळ प्रतिकात्मक सात दगड पुजण्याची परंपरा आहे तीला लातूर जिल्ह्यात आसरा म्हणून ओळखले जाते. आसरा म्हणजे तुच आमची राखण करणारी, सहारा देणारी, पाणी पाजणारी. याच आसराची पुजा वेळा आमवस्येच्या दिवशी प्रत्येक शेतात मस्त ज्वारीच्या कडब्याच्या पेड्यांची कोप करुन भक्ती भावाने केली जाते. सकाळी पूजाकरुन आणि हा सगळा सुग्रास भोजनाचा भोज चढवून मोठी पंगत बसते. जेवण करताना आपण किती खातोय याचे भान राहत नाही. प्रत्येकाच्या कोपीला जावून भज्जीचा अस्वाद घेण्याचा आग्रह होतो, तो टाळता येत नाही, पोटाला तडन लागते. जेवणाच्या पात्रावरुन उठून झोक्यावर जावून झोका खेळायचे खालेले जिरवण्याचा प्रयत्न करायचा. १२ बलुतेदार, आठरा आलुतेदार यांनाही आग्रहाने हा हे सगळे खावू घातले जाते. संध्याकाळी ज्वारीच्या पेंडीचा टेंबा करुन रब्बीचा गहू, हरभरा याच्या वावराला तो पेटवून रान ओवाळून काढायचे, आणि तोच टेंबा मिरवत जावून गावातील मंदिराच्या समोर टाकायचा मोठी आग करुन ती शमली की तीच्या राखेतून विस्तव असतानाच ती ठोकरुन घरी जायचे. असा मनमोहक सण आहे. त्यानंतर घरातले कर्ते पुरुष माळेगावच्या खंडोबाच्या जत्रेला निघून जायचे. ही जत्रा देशभरात वेगवेगळ्या कारणासाठी प्रसिद्ध आहे. मोठा घोड्याचा बाजार (माजी मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख यांच्या सह अनेकांचे दैवत), गाढवांचा बाजार, सगळ्या भटक्या जमातींची पंचायत यावेळी इथे भरते. देशभरातले तृतीयपंथी दर्शनाला येतात (तृतीयपंथांचे माळेगाव अशीही ओळख), तमाशाचे मोठ मोठे फड, यामुळे या जत्रेला पुरुष मंडळीच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने चांगभलं (या वर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यात्रा होणार नाही) असा हा सण आणि त्याची परंपरा आहे आजही मोठे हौसेनी सांभाळली जाते... कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्वांनी काळजी घेऊन आणि गर्दी करु नये म्हणून प्रशासनाने आवाहन केले आहे. प्रशासनाने घालून दिलेले नियम पाळून ही वेळाआमावस्या साजरा करतील!

**– युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

# संपूर्ण जीवन जनसेवेसाठी समर्पित करणारे किशनराव पाटील-इंचूरकर

महाराष्ट्र-कर्नाटक सिमालढ्यात स्वतःला झोकून देत महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्याला वाहुन घेतलेले, बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकी, बसवकल्याण, औराद बार्हाळीसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे हा महाराष्ट्र एकीकरण समितीचा लढा आपण अखेरच्या क्षणापर्यत संपूर्ण ताकदीनिशी लढत राहणार आहोत अशी ग्वाही देणारे किशनराव पाटील इंचूरकर हे ७२ वर्ष पूर्ण करून ७३ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. ०१ जानेवारी २०२२ रोजी त्यांच्या वाढदिवसाचा सोहळा, भालकी शहरात मोठया थाटामाटात साजरा होत आहे. संपूर्ण हयातीत समाजकारण व राजकारणात सक्रीय सहभाग नोंदवून अनेकाच्या जीवनाचे कल्याण करणारे किशनराव पाटील सर्वाच्या गळ्यातील ते ताईत बनले आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक-हार्दिक शुभकामना! व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा! कर्नाटक राज्यातील बिदर जिल्ह्यात इंचूर ता.भालकी यागावी जन्म घेतलेल्या किशनराव पाटील यांनी आपले शिक्षण इंचूर व उदगीर येथे पूर्ण केले. इंचूर गावची पोलीस पाटीलकी सांभाळत-सांभाळत गावाच्या नावाचा लौकीक त्यांनी केला. आपल्या नावातच इंचूरकर म्हणून त्याने गावास गोवले. आज इंचूरकर म्हटले की किशनराव पाटील यांचे गाव असे लोक ओळखतात. छत्रपती शिवाजी महाराज युवक मंडळाची इंचूरमध्ये स्थापना करून त्यांनी १९८२ मध्ये शिवरायाच्या पुतळ्याची उभारणी केली. १९८० ते १९८५ पर्यत ते भालकी तालुका कॉंग्रेसचे उपाध्यक्ष राहीले. कॉंग्रेस सेवादलाचे भालकी तालुकाध्यक्षही ते होते. १९९४ मध्ये बिदर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष म्हणून ते बिनविरोध निवडले गेले होते. माजी मंत्री भिमन्नाप्पाजी खंड्रे संस्थापक अध्यक्ष असलेल्या महात्मा गांधी सहकारी साखर कारखान्याचे सलग १८ वर्षे संस्थापक उपाध्यक्ष राहीले. यांच्या कार्याचे कौतुक म्हणून त्यावेळेचे



पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांच्या हस्ते सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला होता. पिता विठ्ठलराव व माता चंद्रभागाबाई यांच्या पोटी जन्म घेतलेल्या या शेतकरी पुत्राला चार बहिणी व एक भाऊ व पत्नी कुशलबाई यांचे पोटी दोन मुले ३ मुली नातवंडे पंतु असा मोठा परिवार आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीचे नेते माजी आ.कै.बापूसाहेब एकंबेकर, कै.माधवराव वकील जवळगेकर, कै.बापूराव पाटील हुलसूरकर, कै.त्र्यंबकराव पाटील लखनगावकर, कै.बाबाराव वकील व्हणाळीकर, कै.यशवंतराव सायगावकर, माणीकराव जानापुरकर, बाबुराव वकील गौरचिंचोळीकर, ॲड.गोविंदराव पाटील भाटसांगवीकर, रामराव राठोड यांच्या समवेत काम केल्याने ते स्वतःला धन्य समजतात. हाळीखेड व नारंजा साखर कारखान्याच्या उभारणीत व ते चालविण्यामध्ये किशनरावांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. भालकी तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती असतांना त्यांनी भालकीचा जनावराचा आठवडा बाजार सुरू केला १०० प्लॉटची निर्मिती करून लोकांना आडत करून दिली. तो आजतागायत चालू आहे. गेल्या ५५ वर्षापासून ते स्वखर्चाने जनसेवेत कार्यरत आहेत. हा वसा आपण कधी टाकणार नाही असे ते सहकारी, कार्यकर्त्यांना सातत्याने सांगत असतात. एका सहकारी साखर कारखान्याचा सलग १८ वर्षे संस्थापक उपाध्यक्ष, भालकीच्या शांतीवर्धक शिक्षण संस्थेचे २० वर्ष सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समितीचे ५ वर्ष सभापती, बिदर जिल्हा विकास स्वराज्य जनसेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, कुळकायदा ट्रिमलन ॲक्ट (१९९०-१९९६) भालकी तालुका शासकीय कमिटी सदस्य, बिदर जिल्हा किसान सेल जिल्हाध्यक्ष, सेवादल जिल्हाध्यक्ष म्हणून उत्कृष्ट कार्य केले आहे. एकाच कालावधीत गौरचिंचोळी ता.भालकी सोसायटीचे उपाध्यक्ष, डी.सी.सी. बँक भालकी तालुकाध्यक्ष, बिदर जिल्हा डी.सी.सी. बँकेचे उपाध्यक्ष म्हणून एकाचवेळी तीन पदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली आहे. या काळात त्यांनी लोन व वसुली १००% करून जनता व शासनाचे दुत म्हणून यशस्वी योगदान दिले आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीत वर्षानुवर्षे निष्ठेने सक्रीय कार्य आजतागायत सुरू आहे. सीमा लढ्यात त्यांनी सक्रीय सहभाग नोंदविला आहे. एवढी सगळी भक्कम पार्श्वभुमी असलेली राजकीय क्षेत्रातील बडी हास्ती आणि आजही मनाने निर्मळ, वागणुकीत प्रांजळ, कसलाच स्वार्थ नसलेली ही व्यक्ती जीवनात कधी एक साधी मोटार सायकल त्यांनी घेतली नाही. संपूर्ण जीवन जनसेवेसाठी समर्पित करणाऱ्या सीमाभागातील या निस्वार्थी, सेवाभावी, निरगस अशा या हरहुन्नरी तरूण मनाच्या क्रियाशील महान व्यक्तीला वाढदिवसानिमित्त आमचा मानाचा मुजरा!

**– विद्यासागर पाटील, औराद शहाजानी, ता.निलंगा, जि.लातूर**

# देवणी नगरपंचायत निवडणूक निकालाची गरमागरम चर्चा?




**देवणी : शकिल मनियार**

नुकत्याच नगर पंचायतिच्या तेरा प्रभागाच्या निवडणूका पार पडल्या निवडणूक लढविलेले काही उमेदवार देव पाण्यात ठेऊन विजयाची प्रतीक्षा करीत आहेत. प्रतिस्पर्धी आपलाच विजय होणार या आर्विभावात आहेत. या निवडणुकीत विकास कामे, भावी योजना, सोयी सुविधा या कोणत्याही मुद्द्यावर चर्चा झाली नाही जात, आर्थिक स्थिती, या गोष्टी विचारात घेऊन उमेदवारी दिली गेली. ओबीसी आरक्षणाचा पेच निर्माण झाल्याने निवडणूक लढविलेल्या उमेदवाराचा निकाल निवडणूक आयोगाने राखून ठेवल्याने नगर पंचायत निवडणूक लढविलेल्या उमेदवाराची धाकधूक वाढली आहे. या निवडणुकीत मुळातच कॉंग्रेसचे धोरण चुकीचे ठरले,वादग्रस्त उमेदवारांना उमेदवारी देउन पारंपरिक ओट बँक बाजूला सारली आहें. याचे नुकसान कॉंग्रेस पक्षाला होणार आहे. प्रभाग एक हे ब-याच वर्षापासून भा.ज,पा चा बालेकिल्ला राहिलेला आहे,या ठिकाणे मतदारानी जर सक्षम उमेदवाराचा विचारा केला तर या वेळेस कॉंग्रेस चा उमेदवार निवडून येईल अन्यथा भाजपा व कॉंग्रेस मध्ये लढत होऊन थोडक्याच मताने दोन्ही पैकि एक उमेदवार विजयी होईल,प्रभाग दोन मध्ये महाराष्ट्र विकास आघाडीच्या जीवने महादेवी, धनुरे ललिता व मळभगे भाग्यश्री यांच्यात लढत झाली या वार्डात भाजपा धनुरे यांच्या विजयात जीवने महादेवी या अडसर ठरु शकतात भाग्यश्री मळभगे कॉंग्रेसच्या उमेदवार विजयी होण्याची शक्यता अधिक आहे, प्रभाग तीन मध्ये कासले रूपा महाराष्ट्र विकास आघाडी यांच्यात व शेख मेहरुणीसा इस्माईल कॉंग्रेस यांच्यात प्रामुख्याने लढत झाली. वडार समाज या वार्डात मोठया प्रमाणात असल्याने महाराष्ट्र विकास आघाडी चा निकाल लागू शकतो, प्रभाग चार मध्ये तिरंगी लढत झाली. महाराष्ट्र विकास आघाडीचे नागेश जीवने,रासपचे अनंत जीवने व भाजप अशोक लुल्ले यांच्या लढत झाली. यात प्रामुख्याने मविआ व भाजप यांच्यात अटीतटीची लढत झाली. या ठिकाणी भाजप ही जागा बळकावून घेऊ शकते, प्रभाग सहा मध्ये माजी नगराध्यक्ष वैजनाथ आष्टुरे भाजप,मलुल्लेवाले मुझमील मविआ, मिर्झा नदीम कॉंग्रेस यांच्यात लढत झाली. मुस्लिम ब हुबल असल्याने मत विभागणीचा फायदा भाजप ला मिळु शकतो, प्रभाग सात मध्ये भाजप चे अटल धनुरे, महाविकास आघाडीचे जिवणे राजकुमार, कॉंग्रेसचे अमित मानकरी, हे उमेदवार आपले नशीब अजमावून पाहत आहेत. या ठिकाणी भाजप च्या मताची विभागणी होउन कॉंग्रेसचे मानकरी पहिल्यांदा नगरसेवक होऊ शकतात, प्रभाग नऊ मध्ये भाजप चे इंगोले शालीनी, कोतवाल अर्चना अपक्ष, मोमीन बानूबेगम कॉंग्रेस यापैकी भाजपच्या मतांची विभागणी होऊन कॉंग्रेसला फायदा होऊ शकतो, प्रभाग बारा मध्ये भाजप च्या नरवटे विजयमला, कॉंग्रेसच्या बंडगर वंदना यांच्यात प्रामुख्याने लढत झाली, यावेळी कॉंग्रेसचे उमेदवार विजयी होऊ शकतात,प्रभाग तेरा मध्ये सर्वाचे लक्ष्य लागून होते.कॉंग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ते स्व.विजय प्रकाश सूर्यवंशी यांचे सुपुत्र बंटी सूर्यवंशी यांनी कॉंग्रेस शी बंडखोरी करून अपक्ष म्हणजे निवडणूक लढवली आहे. कॉंग्रेसचे देविदास पतंगे यांना मात्र यावेळी नाराज व्हावे लागणार आहे,सर्व कार्यकर्ते चा विरोध असतानाही पतंगे याना उमेदवारी दिली गेली,याचे नुकसान कॉंग्रेस ला सोसावे लागणार आहे,प्रभाग चौदा मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रा.अनिल इंगोले, भाजपचे अमर पाटिल, मविआ च्या अंजली जीवने या च्यात लढत झाली. या ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेस व भाजप मध्ये मुख्य लढत होऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस ही जागा जिंकू शकते असे वाटत असले तरी भाजप चे अमर पाटील यांनी देखील आश्चर्य कारक निकाल लावू शकतात,प्रभाग पंधरा मध्ये भाजप च्या साबणे श्रीदेवी, कॉंग्रेस च्या किर्ती घोरपडे, व मविआच्या सुरेखा शिंदे यांच्यात लढत झाली, मविआ बाजी मारु शकते, प्रभाग सोळा मध्ये कॉंग्रेस सौ घोलपे यांचे मतदान जर महाविकास आघाडीचे सौ बुकटे हे मुस्लीम मतदार घेतले तर येथे भाजपाचे सौ कांबळे हे विजयाच्या वाटेवर असतील व सतरा मध्ये एकतर्फी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या बाजूने निकाल लागण्याची अधिक शक्यता आहे.

# कोविड, ओमायक्रॉनचा प्रसार रोखण्याकरिता आणखी कडक निर्बंध




**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यात कोविड आणि ओमायक्रॉनचा प्रसार होऊ नये यासाठी सरकारने खबरदारीचा उपाय म्हणून आता लग्न समारंभ, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रमांसाठी उपस्थित राहणाऱ्यांची मर्यादा ५० केली असून अंतिम संस्कारासाठी केवळ २० लोकांना मुभा देण्यात आली आहे. राज्य शासनाच्यावतीने जारी परिपत्रकात सदर माहिती देण्यात आली असून बंदिस्त ठिकाणी किंवा खुल्या दालनात संपन्न होणाऱ्या लग्न समारंभांसाठी उपस्थितांची मर्यादा १०० वरून ५० करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दालनात किंवा खुल्या जागेत होणाऱ्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक किंवा राजकीय कार्यक्रमांसाठी ही मर्यादा ५० करण्यात आली आहे. हे निर्बंध ३१ डिसेंबर २०२१ च्या रात्री १२:०० वाजेपासून अंमलात येणार आहे. परिपत्रकात असे ही नमूद करण्यात आले आहे की, अंतिम संस्कारासाठी उपस्थितांची मर्यादा आता अधिकतम २० असेल. त्याच प्रमाणे राज्यातील पर्यटक स्थळे, समुद्रकिनारपट्टी, क्रीडांगणे या सारख्या जास्त लोकांना आकृष्ट करणाऱ्या ठिकाणी सक्षम प्राधिकरणास, २४ डिसेंबरच्या आदेशानुसार लागू केलेल्या सर्व निर्बधांव्यतिरिक्त आवश्यक वाटल्यास (जमावबंदी) १४४ सीआरपीसी लागू करता येईल. या शिवाय आदींच्या आदेशाप्रमाणे लागू सर्व निर्बध पुढील आदेशापर्यत अंमलात राहतील.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# भिवंडीत वाहनतळ नसल्याने पार्किंगची समस्या गंभीर

**भिवंडी/आकाश गायकवाड**

भिवंडी शहर नियोजन शून्यतेमुळे अक्षरशः बजबजपुरी होऊन राहिली असताना याकडे लोकप्रतिनिधी व प्रशासन यांचे सोयीस्कर दुर्लक्ष होत आहे असे खेदाने म्हणावे लागेल. भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ असताना शहरात मुख्य ठिकाणी एक ही वाहनतळ नसल्याने कामानिमित्त शहरात आलेल्या नागरीकांना वाहन उभी करायची कोठे या समस्येला सामोरे जावे लागत असताना रस्त्याकडेला वाहन उभी केल्यास वाहतूक पोलीस नो पार्किंग चा बाऊ करून कारवाई करीत असल्याने वाहनचालक दुधारी संकटात फसत आहे तर वाहने रस्त्यावर उभी असल्याने वाहतूक कोंडी चा सामना इतरांना करावा लागत आहे हे दुर्दैवी.

भिवंडी पालिका मुख्यालया समोरील रस्त्या लगत उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पंचायत समिती, सहा निबंधक कार्यालय, पोलीस उपायुक्त अशी विविध शासकीय कार्यालय असल्याने संपूर्ण तालुक्यातून नागरिकांचा राबता या परीसरात असताना या ठिकाणी वाहनतळ नसल्याने वाहन धारकां समोर वाहन उभी करण्याची समस्या आहे. तर वाहतूक विभागाने शहरातील ७५ विविध भागात नो पार्किंगचे फलक लावून वाहन उभी करण्यास मनाई केली असताना वाहन नक्की कुठे नेवून उभी करायची याचे उत्तर कोणतीही यंत्रणा देत नाही. दरम्यान नुकताच एक महिन्या पूर्वी शिवाजी चौक येथे भव्य वाहनतळ पालिकेने उभारले असून ते शहरातील मुख्य कार्यालय परिसरात पासून दूर असल्याने त्याचा फायदा फक्त ग्रामीण भागातून बाजारहाट करण्यसाठी येणाऱ्या नागरीकांना होणार आहे. शहरातील वाहतूक सुरळीत होण्या साठी रस्त्यावर सिग्नल लावणे गरजेचे असताना यापूर्वी २००८ मध्ये केंद्र शासनाच्या अपरंपारीक ऊर्जा मंत्रालयाने सौरऊर्जेस प्राधान्य देण्यासाठी भिवंडी पालिक्स तब्बल १ कोटी २० लाख रुपयांचे अनुदान दिल्यावर सौर उर्जेवरील सिग्नल यंत्रणा उभारली. परंतु ती सुरू न होताच सडून गळून पडली त्यानंतर पुन्हा चालू आर्थिक वर्षात पालिकेने वंजारपट्टी नाका, कल्याण नाका, आयजीएम रुग्णालय, स्व.आनंद दिघे चौक या ठिकाणी सिग्नल यंत्रणा उभारणी करण्यसाठी तब्बल ६० लाख रुपये खर्च करण्यात आले. परंतु फक्त वंजारपट्टी नाका येथील सिग्नल यंत्रणा सुरू झाली, तर स्व आनंद दिघे चौक येथील यंत्रणा उदघाटन केल्या नंतर अवघ्या एक तासा पासून बंद आहेत. त्या आज ही सुरू झालेल्या नाहीत हे विशेष. तर कल्याण नाका, आयजीएम येथील यंत्रणा अजून उभारणीचे कामच सुरू झाले नाही. त्यामुळे या योजने वरील पैसा नक्की गेला कुठे असा सवाल नागरीक विचारात असून सध्या पालिका मुख्यालया समोरील उड्डाणपुला खाली अघोषित वाहनतळ उभारले गेले असून तेथेच वाहन उभी केल्याने सर्वसामान्य जनतेला चालण्यासाठी रस्ता सुध्दा शिल्लक राहत नाही.

## लाखो रुपये खर्चून बनविलेली सिग्नल यंत्रणा बंद



# खनिपट्याची ईटीएस मशिनव्दारे मोजणी करावी, भाजयुमोने दिले निलंगा तहसिलदाराना निवेदन!

**देवणी/प्रतिनिधी**




मौजे निंलगा तालूक्यातील अंबेवाडी येथील ऐतिहासीक वारसा असलेल्या डोंगरावरती ऐश्वर्या कंपनी, ओ.एस.डी. बीड-लातुर ए.यु.आय.फेज वन प्रा.लि. औरंगाबाद या कंपनीला लांबोटा ते तोगरी मोड या रस्ताचे काम चालु आहे या रस्ताच्या कामासाठी अंबेवाडी ता निंलगा येथे खनिपट्टा व खडीकेंद्र परवाना देण्यात आला आहे. हा परवाना देत असताना प्रदुषण व पर्यावरण विभागाचे नियमाचे कुठेच पालन केलेले दिसत नाही आहे. नियमाप्रमाने राज्य महामार्गापासुन किमान ५०० मिटर अंतरावरती खनिपट्टा व खडीकेंद्र असायला हवे, पण तसे न करता या सदरील कंपनीने राज्यमहामार्गापासुन १८० मीटर अंतरावरती उत्खन्नन चालु केले. राज्य महामार्गापासुन सदरील प्लांट हा ४०० मिटर वरती बसवला आहे व इ.जि.मा. ८३ इतर जिल्हा महामार्ग जाणारा रस्ता जवळगा, काटेजवळगा, शिरोळ, सावनगिरा जाणारा रस्ता पासुन अवघ्या तिस फुटावरती हा प्लांट आहे. यामूळे प्रदुषण होत आहे. सदरील कंपनीने दगड मुरुम यांचा लाखो ब्रासचा बेसुमार उपसा केला आहे. या खदाणीमध्ये ब्लास्टींग केली जाते. यामुळे तेथील दगड उडुन हे राज्यमहामार्गा व जिल्हा महामार्गावरील रस्तावरती येवुन पडतात. त्यामुळे प्रवास्याच्या जिवीताला धोका आहे व धुळीमूळे आजुबाजुच्या शेतकऱ्याच्या जमीनीचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे जमीन नापीक होत आहे. जनावरे व माणसाचे आयुष्य धोक्यात आहे. सदरील जमीनीने प्रदुषण व प्रर्यावरण विभागाच्या परवानगी घेतली आहे का, असेल तर त्या देण्यात यावा व सदरील खनिपट्टा जमीन ही जिल्हा खानकाम आराखड्यात समाविष्ट आहे का? सदरील कंपनीला सन २०१९-२० व सन २०२०-२१ या वर्षात शासनाकडे किती रायल्टी भरली आहे त्याची माहीती द्यावी व भेसुमार उत्खनन्न केलेल्या खनिपट्टाची ईटीएस मशिनव्दारे मोजणी करावी व शासनाचा करडो रुपयाचा महसुल बडवणाऱ्या कंपनीची चौकशी करुन कायदेशिर कार्यवाही करावी, असे निवेदन निंलग्याचे तहसिलदार गणेश जाधव यांना देण्यात आले आहे यावेळी भाजयुमो तालुका अध्यक्ष रामलिंग शेरे, हिसामनगरचे संरपंच विजयकुमार मूर्के, लक्ष्मण बिरादार लिंबराज बिरादार आदींची उपस्थिती होती.

# गोवानिर्मित विदेशी मद्यासह पावणे अकरा लाखांचा मुद्देमाल जप्त



**सोलापूर/प्रतिनिधी**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने गोवा राज्यात विक्रीस असलेल्या विदेशी मद्य वाहतुकीवर कारवाई करून १० लाख ८२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. सोमनाथ सुधाकर भोसले (वय १९) व ज्ञानेश्वर धर्मा उन्हाळे (वय १९) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे असून फरार आरोपींचा शोध घेत आहेत. निरीक्षक भरारी पथक सोलापूर व निरीक्षक पंढरपूर विभाग यांना मिळालेल्या माहितीनुसार यावली व कोळेगाव (तालुका मोहोळ) या ठिकाणी सापळा रचून गोवा राज्यात विक्री असलेल्या विदेशी मद्याची वाहतूक करणारे टाटा झेनॉन व पिकअप थांबून तपासणी केली असता त्यात विदेशी मद्याच्या १८० मिलीच्या २३५२ बाटल्या व ६५० मिलीच्या ६२४ बाटल्या असा सुमारे १० लाख ८२ हजार ४०० रुपयांचा ऐवज मिळून आला. यावेळी पथकाने सोमनाथ भोसले ज्ञानेश्वर उन्हाळे या आरोपींना अटक केली असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे. ही सदरची कारवाई राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक नितीन धार्मिक, उपअधीक्षक आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक पवन मुळे, दुय्यय निरीक्षक एस.ए.पाटील, मनीषा मिसाळ, जी.एस.उंडे, एम.एम. शेख, पी.बी. देशमुख, गजानन होळकर, जवान पी.एस.सावंत, के.एस.लुंगसे, अण्णा करचे, सी.एस.व्हनगंटी यांनी सहभाग नोंदविला आहे. पुढील तपास पवन मुळे, एस.ए.पाटील करत आहेत.

# कारंबा येथे साडेचार लाखांचा गुटखा जप्त



**सोलापूर/ईरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेने सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर तालुक्यातील कारंबा येथे एकास अटक केली असून त्यांच्याकडून साठा केलेला ४ लाख ६५ हजारांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. अमीर हारून शेख (रा. कारंबा ता उत्तर सोलापूर जि सोलापूर) असे अटक केलेल्या आरोपीचं नाव आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना कारंबा येथे एका इसमाने त्याच्या घरी गुटख्याचा साठा करून ठेवलेला गोपनीय माहिती मिळालेला होता अशी खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे अन्न व प्रशासन अधिकारी यांच्यासमवेत कारंबा येथे पोहोचले. पथकाने शेख याच्या घरावर छापा टाकला तेव्हा ४ लाख ६५ हजारांचा गुटखा साठा मिळून आला आहे. पथकाने जप्त केला असून आरोपी शेख याला अटक करण्यात आली आहे. याबाबत अन्न व औषध प्रशासन अधिकारी प्रशांत कुचेकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर, सहाय्यक फौजदार राजेश गायकवाड, श्रीकांत गायकवाड, आबा मुंडे, रवी माने, सचिन गायकवाड, केशव पवार यांनी कारवाई केली आहे.

# भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचा १३७वा वर्धापन दिन वाड्यात उत्साहात साजरा



**वाडा/प्रतिनिधी**

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचा १३७ वा वर्धापन दिनानिमित्त मंगळवारी (दि.२८ डिसेंबर) वाडा तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने वाड्यातील पक्ष कार्यालयात वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी कॉंग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी ध्वजारोहण करून मानवंदना दिली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी सचिव मनीष गणोरे, पालघर जिल्हा कॉंग्रेस कमिटीअध्यक्ष प्रफुल्ल पाटील, वाडा तालुका कॉंग्रेस अध्यक्ष दिलीप पाटील, शहराध्यक्ष सुशील पातकर, वाडा नगरपंचायतीच्या नगरसेविका तथा माजी उपनगराध्यक्ष भारती सपाटे, पालघर जिल्हा कॉंग्रेसचे सचिव अनंता वनगा, ज्येष्ठ नेते आदनान धागे, सॅमसंग (राजू) वाडिया, पालघर जिल्हा युवक कॉंग्रेसचे सरचिटणीस यश शिंगडा, वाडा तालुका युवक कॉंग्रेस अध्यक्ष गणेश (बाळा) बाराठे, वाडा शहर युवक अध्यक्ष मोहित पाटील, सेवादलाचे तालुकाध्यक्ष जगदीश केणे, सेवादल शहराध्यक्ष संदीप कराळे, प्रकाश (पशु) काबाडी, राजू रहाणे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# कंटेनरच्या चाकाखाली येऊन सुगवे येथील तरुणाचा मृत्यू

**कर्जत/धर्मानंद गायकवाड**



रासदड जिल्ह्यातील कर्जत मुरबाड राज्यमार्गावर एका बाईक स्वराचा अपघात झाला. यात त्या तरुणाचा उपचारा दरम्यान अखेर मृत्यू झाला. अपघातात मयत तरुणाचे नाव अक्षय ऐनकर असे असून तो कामावरून घरी परतत असताना समोरून येणाऱ्या कंटेनरच्या धडक दिल्याने अक्षयचा या अपघातात म्रृत्यु झाला आहे. अक्षय हा बाईकवर मागच्या सिटवर बसला होता, मात्र कंटेनरचा चाकाखाली अक्षय आल्याने त्याचा दुर्दवी म्रृत्यु झाला आहे.

या बाबत अधिक माहीती अशी की, कर्जत मुरबाड या राज्यमार्गावर येत असलेल्या कशळे येथील वाकडा पूल येथे बुधवारी २९ डिसेंम्बर रोजी सांयकाळचा सुमारास अक्षय बाईकस्वरा सोबत घरी जात असताना बाईकला कंटेनरने धडक दिल्याने अपघात घडला होता. मुरबाड कडून कर्जत च्या दिशेने भरधाव येणाऱ्या कंटेनरने, कर्जतहुन कशळेकडे जाणाऱ्या अक्षय याचा बाईकवरुन जात असताना हा अपघात घडला होता. यात बाईक स्वार कंटेनरचा मागील बाजूस लागलेल्या धडकेने बाजूला फेकला गेला होता. तर बाईकच्या मागच्या सीटवर बसणारा अक्षय कंटेनरच्या मागील चाकात अडकला, कंटेनरचा चाकच अक्षयच्या कंबरेच्या खालच्या बाजूकडील पायाच्या उजव्या बाजूवरून गेल्याने यात अक्षय गंभीर जखमी झाला होता. मात्र उपचारा दरम्यान अक्षयचा म्रृत्यु झाला आहे.

विशेष म्हणते या अपघात घडलेल्या ठिकाणाहून कटनेर चालकाने पळ काढला होता. तर जखमी झालेल्या अक्षय ला पाहण्यासाठी नागरिकांनी एकाच गर्दी केली होती. अक्षय हा रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यावर पडला होता, त्याचा पायाचे आणि हाताचे हाड मोडल्याने अक्षयला उठताही येत नव्हते, मात्र तो आपल्या शरीराची हालचाल करत असल्याने, जमलेल्या बघ्यानी प्रथम व्हिडिओ काढणे पसंत केले, कोणीही अक्षय ला उचलण्याची हिम्मत देखील केली नसल्याचं चित्र या ठिकाणी दिसत होते. त्यानंतर काही लोकांनी समोर येवुन अक्षयला उपचारासाठी कशळे येथील शासकीय रुग्णालयात असता अक्षयचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दरम्यान या अपघातात मयत असलेला अक्षय हा कर्जत येथील सुगवे गावात राहणारा होता. अक्षयच्या अशा जाण्याने परिसरात प्रंचड शोककळा पसरली आहे. दरम्यान अपघातच्या ठिकाणाहून पळ काढणाऱ्या कंटेनर चालकाला कर्जत पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याचेवर गुन्हा नोंद करण्यात आला आसुन कंटेनर चालकाला अटक करण्सात आली आहे. या घचनेचा अधिक तपास कर्जत पोलिस करीत आहेत.

# हेमा ढवण यांचा बेस्ट मेकअप आर्टिस्ट पुरस्काराने सन्मान

**भिवंडी/प्रतिनिधी**



भिवंडीतील हेमा संजय ढवण यांचा मेकअप क्षेत्रातील मानाच्या समजल्या जाणाऱ्या दादासाहेब फाळके फॅशन आयकॉन लाईफस्टाईल बेस्ट मेकअप आर्टिस्ट पुरस्काराने नुकताच सन्मानित करण्यात आले आहे. मुंबईत एनिग्मा फैशन मैनेजमेंट आणि स्नेहा फॅशन फ्यूजन द्वारा आयोजित केलेल्या कार्यक्रमाप्रसंगी हेमा यांना सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्कार सोहळ्याप्रसंगी प्रसिद्ध अभिनेता नील मोटवाणी, मिसेस इंडिया यूनिवर्स रूपल मोहता, शमीम खान, तसेच सपना सिराकर, वेरोनिका वानिज, बॉलीवूड अभिनेत्री मालवी मल्होत्रा, मुस्कान शर्मा तसेच अभिनेता छोटू दादा सहित अनेक कलाकार उपस्थीत होते. हेमा ढवण या एक गृहीणी असून घरची जबाबदारी सांभाळून त्यांनी फैशन डिजाइनिंगचा कोर्स करून स्वतःच्या पायावर उभे राहून मेकअप क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावल्याने भिवंडी शहरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वाढत्या कोविड संसर्गाच्या पार्श्वभूमीवर राज्यात लसीकरणाचा वेग वाढवावा - मुख्यमंत्री ठाकरे

**मुंबई/प्रतिनिधी**

कोविडचा संसर्ग वाढत असून तो रोखण्यासाठी लसीकरणाचा वेग अधिक वाढविण्याची गरज आहे. आपल्याला अधिक दक्षता बाळगून काटेकोर पाऊले उचलावी लागणार आहेत, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले. टास्क फोर्सची बैठकही येत्या एक दोन दिवसांत आयोजित करावी असेही निर्देश त्यांनी दिले. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोविडच्या वाढत्या संसर्गावर चिंता व्यक्त करण्यात आली. यावेळी आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ प्रदीप व्यास यांनी सादरीकरणात जानेवारीच्या मध्याला कोविडच्या सक्रिय रुग्णात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली. लसीकरणाचा वेग वाढविण्याची गरज आहे असे सांगितले. काही दिवसांपूर्वी आपण दिवसाला ८ लाख डोसेस देत होतो, सद्या ५ लाख डोसेस दिवसाला दिले जातात. यावेळी मुख्यमंत्र्यांनी सर्व पालकमंत्र्यांनी पाठपुरावा करून आपापल्या जिल्ह्यांत लसीकरण वेगाने होईल असे पाहण्याचे निर्देश दिले. राज्यात पॉझिटिव्हिटी रेट १.०६ टक्के झाल्याचेही ते म्हणाले.

# बस बंद असल्याने विद्यार्थ्यांची खाजगी वाहनांकडे धाव



**वाडा/प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा संप चालू असल्याने वाडा आगारातील दोनशे पेक्षा जास्त कर्मचारी संपात सहभागी झाल्याने वाडा आगारातील फक्त सहा बस रस्त्यावर धावत आहेत त्या ग्रामीण भागात चालतात मात्र अंबाडी, कुडूस, नेहरोली, मनोर, कंचाड, गारगाव, परळी, तीळसा व तालुक्यच्या अती दुर्गम भागातून हजारोंच्या संख्येने विद्यार्थी रोज शिकण्याच्या निमित्ताने वाड्यात येत आहेत. राज्य परिवहनच्या बस बंद असल्याने अशा विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत असून त्यांना खाजगी वाहनांकडे धाव घ्यावी लागत आहे. सुरुवातीला वर्गातील निम्म्या विद्यार्थ्यांना व उर्वरित दुसऱ्या दिवसी शाळेत बोलावले जायचे मात्र आता नियमितपणे शाळा सुरू झाल्याने विध्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती लागत आहे त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची गर्दीही वाढली आहे. मात्र बस बंद असल्यामुळे लांबून येणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक फटका बसत आहे. यासाठी बस सेवा लवकरात लवकर सुरू होण्याची मागणी पालकांकडून होत आहे. कोरोना काळात शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणीक नुकसान झाले आहे. या पुढे ते होऊ नये यासाठी शासकीय स्तरावर संपावर तोडगा काढून बस सेवा पूर्ववत चालू करावी. अशी मागणी आदिवासी मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष अनंता वणगा यांनी केली आहे.

# इलेक्ट्रीक वाहन नोंदणी सूट मर्यादेस मुदतवाढ

**मुंबई/प्रतिनिधी**

इलेक्ट्रीक वाहन धोरणांतर्गत ३१ डिसेंबर २०२१ पर्यत असलेली त्वरीत नोंदणी सूट ची मर्यादा दिनांक ३१ मार्च २०२२ पर्यत वाढविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्याचबरोबर दि. १ जानेवारी २०२२ पासून शासकीय व निमशासकीय यंत्रणा तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत खरेदी करण्यात येणारी वाहने बॅटरी इलेक्ट्रीक वाहने असावीत. तसेच दि. १ एप्रिल २०२२ पासून शासकीय वापरासाठी भाडेतत्वावर घेण्यात येणारी सर्व वाहने ही बॅटरी इलेक्ट्रीक असतील, असेही यासंदर्भातील शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे. राज्याने २३ जुलै २०२१ च्या शासन निर्णयानुसार इलेक्ट्रीक वाहन धोरण जाहीर केले आहे. इलेक्ट्रीक वाहन खरेदीस चालना मिळावी म्हणून या धोरणामध्ये विविध प्रकारची प्रोत्साहने जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये त्वरीत नोंदणी सूट या प्रोत्साहनाचा समावेश आहे. तसेच दि. १ एप्रिल २०२२ पासून परिचालित होणारी सर्व शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत व शासनाच्या निधीमधून खरेदी करण्यात येणारी वाहने बॅटरी इलेक्ट्रीक वाहने असावीत असा निर्णय घेण्यात आला आहे.

# केमिकलयुक्त दूषित पाणी पिऊन गाईचा मृत्यू



**अंबरनाथ/सुनिल तांबे**

पाळीव जनावरे बाहेर चरायला गेले असता त्यांना निसर्गाने दिलेल्या वरदाना नुसार पाण्याची गरज त्याच्या शरीरात निर्माण झाली की. ते प्राणी पाण्याचा शोध घेत पाण्या जवळ जाऊन ते ज्या परिस्थितीत म्हणजे गढूळ असो की काही मिश्रित.पण आपली तहान शमवतात.पाणी पिहून तृप्त होतात. तेथील केमिकलयुक्त दुशीत पाणी पिहून मृत्यू पावतात. अशीच घटना. केमिकलयुक्त दुशीत पाणी पिहून एका गाईचा मृत्यू झाल्याची घटना अंबरनाथ पश्चिम बुवापाडा भंगार गल्ली येतील खदानी परिसरात घडली. अंबरनाथ पश्चिम बुवापाडा येथील भागात शासकीय जमिनीचा भाग गिळकृत करून मोठया प्रमानाथ भंगाराचे दुकानें उभे करून भंगाराचा व्यवसाय राज रोज पणे सुरु आहे.तो परिसर केमिकल डम्पिंगग्राउंड बणणार की काय अशी परिसरातील नागरिकांच्या मनात शंका निर्माण होत आहे. भंगार व्यवसाहिक रासायनिक कंपनीतून केमिकलचे ड्रम व केमिकलरहित काही वस्तू विकत आणून त्याला जाळून विकण्या जोगे बनवतात. ते जळल्या नंतर त्याच्या पासून जो धूर निघतो त्या धुरापासून नागरिकांना स्वास घेण्यासाठी त्रास होतात हे तेथील नागरिकांचे मनने आहे. ते केमिकलचे ड्रम व त्याच्या मध्ये असलेले केमिकल खदानिमधील साचलेल्या पाण्यानि धुतले जातात ते खदानीतील पाण्या मध्ये मिश्रीत होऊन पाणी दूषित होत. आणि काही वर्षा पूर्वी उल्हासनगर इथे जिन्स वाशिंग कारखाने होते. त्या कारखान्याती केमिकलयुक्त दूषित पाणी शुद्दीकरण न करता नदी मध्ये सोडल्या जायचं. नदीतील पाणी दूषित व्हायचं. शासनानी वाशिंग कारखाने बंद केली.जीन्स वाशिंग कारखान्याला जो पर्यन्त पाणी शुद्दीकरण यंत्र बसवल्या जात नाही व अनधिकृत जागेवर परवानगी नाही.तरी सुद्धा जीन्स वाशिंग कारखाने राज रोज पणे प्रशासन सुरु कसे करू देतात. ही शासनाची जबाबदारी नाही का की शासन कुठेतरी जबाबदारी टाळतोय असा प्रशन निर्माण होतोय.जीन्स वाशिंगचे सुद्दा कारखाने नव्याने मोठ्या प्रमानात सुरु करण्यात आले. ते सुद्दा केमिकलयुक्त पाणी खदाणीच्या पाण्यात मिसळून खदाणीचे पाणी दुशीत होत आहे.ते दूषित पाणी पिहून एका गाईचा मृत्यू झाला. जाणवराच्या मालकाचे असे मनने आहे. नागरिकांना होणारा त्रास कम्प्लेंट करून सांगितला तरी सुद्दा शासन लक्ष देत नाही. नागरिकांना होणार त्रास कधी थांबणार असेही त्यांचे मनने आहे.कम्प्लेंट केल्यानंतर लोक शेवक येतात आणि त्यांना तोंडी बोलून जातात पण कठोर कारवाही करीत नाही असे तेथील स्थानिक नागरिकांचे मनने आहे.



## आ.रमेश कराड यांच्याकडुन गंगापुरला नववर्षाची भेट म्हणून १२ लाख आमदार निधी

**भारतीय जनता पार्टी चे लातुर जिल्हाध्यक्ष व आमदार रमेश कराड यांच्याकडुन गंगापुर गावातील विकास कामांसाठी १२ लक्ष रुपये निधी देण्यात आला आहे. या निधीतुन उर्वरित ग्रामपंचायत कार्यालयाचे काम होणार असून त्याचा सार्वजनिक वाचनालय म्हणुन वापर करण्यात येणार आहे. सदर आमदार निधी आमदार रमेश कराड यांनी उपलब्ध करून दिल्याबद्दल गंगापुर गावाच्या वतीने व ग्रामपंचायत गंगापुर च्या वतीने प्रत्यक्ष भेटुन लोकनियुक्त सरपंच बाबु हणमंतराव खंदाडे, उपसरपंच रफीक शेख, ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब मिंड, ईश्वर शेलार, सोसायटीचे संचालक सतीश धोत्रे, सिकंदर शेख, विनोद दंडीमे, राम शिंदे, नारायण दहीवाले व हरगुंळ (बु)चे पंचायत समिती सदस्य अरविंद सुरकुटे, हणमंतराव दंडीमे आदि जणांनी उपस्थित राहून आमदार रमेश कराड यांचे आभार मानले.**

## व्हिडिओ काढून ब्लॅकमेल करणाऱ्या सासऱ्याच्या विरोधात गुन्हा दाखल

**सोलापूर/प्रतिनिधी**

सुनेचा अंघोळ करतानाचा व्हिडिओ काढून त्याला ब्लॅकमेल करणाऱ्या सासऱ्यावर पंढरपूर तालुका ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर आरोपी अटक करण्यात आली आहे. घटनेची अधिक माहिती अशी की, पीडित महिलेस पतीपासून मूलबाळ होत नसल्याने सासरऱ्याने तिच्याशी काही दिवसापूर्वी बळजबरी करण्याचा प्रयत्न केला होता. याबाबत तिने आपल्या पतीस देखील माहिती दिली होती. परंतु त्याने तिची समजूत काढली. दरम्यान २० डिसेंबर रोजी पीडित महिला आपल्या घरातील बाथरुममध्ये अंघोळ करीत असताना तिच्या सासऱ्याने मोबाईलवर चोरून व्हिडिओ काढला. तसेच सदर व्हिडिओ सुनेला दाखवून तुला माझ्या मुलापासून मुलं होणार नाही तू माझ्याशी संबंध ठेव तुला मुलं होईल असे म्हणून दबाव आणला अन्यथा सदर व्हिडिओ इतरांना पाठविण्याची धमकी देखील दिली. दरम्यान पीडित महिलेने फोन करण्याच्या बहाण्याने सासऱ्याचा मोबाईल घेऊन सदर व्हिडिओ आपल्या भावाला पाठविला व आपल्या माहेरी मंगळवेढा येथे जाऊन सदर प्रकार सांगितला. त्यामुळे मुलीच्या आई-वडिलांनी पंढरपूर तालुका ग्रामीण पोलीस ठाण्यात मुलीच्या सासऱ्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला असून त्यास अटक देखील करण्यात आली आहे. घटनेचा पुढील तपास हवालदार आप्पा कर्चे करीत आहेत.

पान १ वरून....

### रक्ताच्या नात्याचा घरातच पडला...

धाकटा मुलगा हणमंत हा अलिकडे दारूच्या व्यसनाच्या आहरी जास्त गेला होता. तो कायमच दारूच्या नशेत राहत होता. त्यामुळे त्याची पत्नी त्याच्या या दारू पिण्याच्या वागण्याला कंटाळलेली होती. तो दारू पिऊन आला की घरातील आई वडिल पत्नी याचेबरोबर कुठल्या ना कुठल्या कारणातून भांडण उकरून काढून वाद घालत होता. दारूच्या नशेत वडिलांना भावाला शिव्या देणे त्याना मारून टाकण्याची धमकी देणे असा प्रकार तो करीत होता.त्यामुळे त्याचे घरचे लोक ही त्याचेवर चिडले होते. त्याला त्यांनी बऱ्याच वेळेला समाजावून सांगून सरळ वाग तुझ्या बायका मुलाकडे लक्ष दे म्हणून सांगितले होते. घरात लक्ष देवून शेताकडे ही त्याला लक्ष देण्यास सांगितले होते. परंतू हणमंत याने त्याच्या या सांगण्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले होते. उलट तो मित्राच्या संगत गुणामुळे जास्तच भरकटत चालला होता. सकाळ संध्याकाळ दारू पिऊन येणे घरात धिंगाणा घालणे, घरच्या लोकांना शिवी गाळ करणे हेच त्याचे काम बनले होते. वडिल भाऊ तर त्याला किती वेळा समाजावून सांगणार होते. त्याचा संसार त्याची बायका मुले त्यालाच बघावे लागणार होते.त्यातच हणमंत हा अलिकडे दारू पिऊन घरात आला की वडिलाच्याकडे आणि भावाकडे घराची आणि शेताची वाटणी मागत होता.त्या वाटणी करून माझे मला माझ्या नावावर करून दया म्हणत होता. तो पुर्णपणे दारूच्या व्यसनाच्या आहारी गेला असल्याने त्याला घराची किंवा शेताची वाटणी करून दिल्यास तो ते सगळे दारूच्या व्यसनात घालवेल याची भीती ही त्याना होती म्हणून ते त्याला घराची आणि शेतीची वाटणी करून देत नव्हते. याचा नेमका वेगळा अर्थ हणमंत याने काढला होता. मोठा भाऊ मारूती याने वडिलाना सांगितल्यानेच वडिल घराची आणि शेतीची वाटणी करीत नाहीत असा समज त्याने करून घेतला होता. याकारणातून त्याने वडिल आणि भावाबरोबर भांडणे ही काढली होती. तुम्ही मला घरात आणि शेतीत वाटणी करून देत नाही म्हणून मी जास्त दारू पित आहे. तुम्हीच मला दारूच्या व्यसनात ढकले आहे असे उलटे खापर तो त्याचेवर फोडत होता. त्यामुळे वडिल आणि भाऊ ही डोक्याला हात लावीत होते. आपण त्याला दारूचा नाद सोड सरळ वाग संसाराकडे लक्ष दे म्हणून सांगत असताना तोच जास्त दारू पितो आणि उलट आपल्यावरच खापर फोडतो म्हणून ते त्याला आता काही सांगायचे ही सोडून दिले होते. याचाच गैरफायदा हणमंत हा जास्तच घेत होता. अलिकडे तर दिवसे दिवस त्याचे दारू पिण्याचे व्यसन जास्तच वाढले होते.त्यामुळे केल्या काही महिन्यापूर्वी त्याची पत्नी मुलांना घेऊन तिच्या माहेरी गेली होती. याचे ही खापर त्याने आपल्या घरच्या लोकावरच फोडले होते. त्यातच तो दारू पिऊन आला की किरकोळ कारणावून वाद घालीत होता. शनिवार ता.२५ डिसेबर २०२१ रोजी सकाळी हणंमत याचे वडिल वसंत माळी भाऊ मारूती माळी हे दोघे ही शेतात कामावर सकाळी सकाळी गेले होते.त्यातच त्यानी दुपारी घराकडे येताना विहिरीवरील पाण्याच्या मोटारीची दोरी घराकडे घेऊन आले. नेमके दुपारच्या सुमारास दारुच्या नशेत हणमंत हा घराकडे आला. त्याला वाद घालायला काही तरी कारण हे पाहिजेच होते.म्हणून त्याने वडिल वसंत माळी याचेबरोबर मला न विचारता विहिरीवरील पाण्याच्या मोटारीची दोरी का घराकडे आणाला म्हणून वाद घालत त्यांना शिव्या देऊ लागला. त्यावर वडिल त्याला समाजावून सांगत काम असल्याने दोरी आणली आहे तु गप्प बस असे म्हणाले. त्यावर हणमंत हा त्याना मारायला त्याचे अगांवर गेला. तो त्याना धक्काबुक्की करीत होता. वडिल हे वयोवृध्द असल्याने ते जास्त प्रतिकार करू शकत नव्हते. तरी ही ते दारूच्या नशेत असणाऱ्या हणमंत यास हातानी मागे ढकलत असताना त्यानी बाजुलाच पडलेली एक लाकडी काठी उचलली आणि हणमंत याला त्या काठीने मारहाण करायला सुरूवात केली. त्यावेळी हणमंत याने त्याच्या हातातील काठी हिसकावून घेत बाजुला फेकली. तो त्याना मारहाण करीत असताना त्याचवेळी तेथे बाहेर गेलेला मारूती आला. तो दोघाच्या मध्ये पडून भांडण सोडवत असताना हणमंत याने त्याला तुझ्यामुळेच घरात भांडणे लागत आहेत, तुच या भांडणाला जबाबदार आहेस असे म्हणत थांब तुलाच संपवतो म्हणत त्याचे अगांवर काठी घेऊन मारायला जावू लागला. त्यावेळी मारुती आणि वडिल वसंत माळी यांनी त्याला दाबून धरले आणि खाली पाडले.ते दोघे त्याला मारहाण करू लागले होते. माळी वस्तीत त्याच्या भांडणामुळे गोंधळ उडाला होता.बघ्यांची गर्दी झाली होती.पण त्याचे भांडण हे नेहमीचेच आहे म्हणून कुणी सोडावयाला जात नव्हते. वसंत माळी आणि मारूती माळी हे दोघे हणमंत याला लाथाबुक्कांनी मारहाण करीत असताना वसंत याना राग अनावर झाला त्यानी जवळच पडलेला मोठा दगड उचलला आणि हणमंत याच्या डोक्यात घातला.त्यासरशी हणमंत याचे डोके फुटून त्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. जमीनवर रक्ताचे थारोळे साचले होते. त्यात हणमंत हा निपचिप पडला होता. जागीच त्याचा मृत्यू झाला होता. हे बघून घटनास्थळावरील लोकांनी तेथून काढता पाय घेतला. एका भांडणाने एक दुर्देवी घटना घडली होती. भांडण कुठल्या कुठे पोहचले होते. हणमंत याचा जागीच मृत्यू झाल्याने घराच्या बायकांनी आरडा ओरडा करायला सुरूवात केली होती. एव्हान या घटनेची माहिती कुणी तरी कवठेमंहाकाळ पोलीसांना दिली होती. विभागीय पोलीस अधिकारी रत्नाकर नवले आणि कवठेमंहकाळ पोलीस स्टेनचे पोलीस निरीक्षक जितेंद्र शहाणे यांनी घटनास्थळी भेट देवून घटनेची माहिती घेऊन घटनास्थळाची पाहणी केली. कवठेमंहकाळ पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कवठेमंहकाळ येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. ही घटना कोणत्या कारणातून आणि कुणी केली याचा माहिती पोलीसाना मिळाली होती. पोलीस या घटनेतील संशयीत आरोपी वसंत माळी, आणि मारूती माळी याचा शोध घेत असताना शनिवारी रात्रीच्या सुमारास या घटनेतील वसंत माळी याना गावातूनच पोलीसांना अटक करून ताब्यात घेतले.तर रविवार पहाटे मारूती माळी याला पोलीसांनी शोधून काढत त्याला ही ताब्यात घेतले होते. त्याचेकडे पोलीस या घटनेची चौकशी करत असताना त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसाना दिली. खरे तर त्याना हणमंत याला मारायचे नव्हते. परंतू दारूच्या नशेत असणारा हणमंत हा त्याना जीवे मारण्याची धमकी देत होता. तसेच त्याचे हे नेहमीचेच झाले होते.त्यामुळे त्याच्या त्रासाला वैतागून रागाच्या भरात आपल्या हातून हे कृत्य झाल्याचे वडिल हणमंत माळी यांनी पोलीसांना सांगितले. मयत हणमंत माळी याचा चुलत भावाने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी हणमंत वसंत माळी (वय ३०) याच्या खून प्रकरणी वसंत रामू माळी (वय ७५) व मारुती वसंत माळी (वय ३३) याचे विरूध्द भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली काठी व दगड जप्त केले. या घटनेचा पुढील तपास कवठेमंहकाळ पोलीस स्टेशनचे स.पो.नि.शिवाजी करे हे करीत आहेत. खरे तर कोणतेही व्यसन हे वाईटच असते. त्यातून काहीच निष्पन्न ही होत नसते. दारूची नशा करी जीवनाची दुर्दशा असे म्हटले जाते. तरीही बरेच जण दारूच्या व्यसनाच्या आहारी जात असतात त्यातून त्याचा ताळमेळ राहत नाही आणि घरा दाराला त्रास होत असतो त्यातूनच एखादी अघटित अशी खूनासारखी घटना घडते हेच यातून दिसून येते.

### दारूच्या व्यसनामुळे पुरता कामातून...

वर्षे यांच्या समावेश आहे. मृतक रोशन रामू खोडके याचे आई-वडील लहानपणीच मरण पावल्याने मोठी बहिण मनीषा ईश्वर चुधरेकडे कांद्री यांच्याकडे राहत होता. रोशन बहिणीकडे मोठा होऊन मोलमजुरीच्या कामाला जात असे. रोशन ला दारूचा नाद लागल्याने रोशन नेहमी बहिण मनीषा व भाची यांना दारू पिऊन नेहमी शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या धमक्या देत असे. त्यामुळे बहिण मनीषा पती ईश्वर नेहमी संतापलेले असत. राग अनावर झाल्याने रोशनची मोठ्या बहीनीने आपल्या जांब येतील लहान मेव्हणे हीतेंद्र देशमुख यांना रोशन नेहमी देत असलेल्या त्रास संबंधी सांगितले. यातच मोठी बहीण मनीषा व मेव्हणे हितेंद्र रतिराम देशमुख व प्रेम उमा चरण सूर्यवंशी यांनी रोशन खोडके याला कांद्री येथुन दारू प्यायला दिली. मोटर सायकलने पांजरा गावातील शेत शिवारात नेऊन त्याचा गळा दाबला व त्यानंतर त्याच्या डोक्यावर पाठीमागे दगडाने मारून ठार केले. मात्र हे सर्व आरोपी अवघ्या चार तासात जेरबंद करण्यात आले असून तीनही आरोपी यांना आंधळगाव पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवून अटक करण्यात आली आहे. तर पुढील तपास पोलिस करीत आहेत.

पान ८ वरून....

### भारतीयाच्या मनात अंत्योदय,एकात्म...

यांच्या वाटचालीविषयी विचार मांडले.कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून व स्व.अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा युवा मोर्च्याचे शहर जिल्हाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अब्दुलगालीब शेख यांनी केले तर आभार ॲड.गणेश गोजमगुंडे यांनी मानले. यावेळी रविशंकर केंद्रे, राजेश पवार, ॲड.प्रकाश काळे, वैभव डोंगरे, ॲड.पंकज देशपांडे, ॲड.सचिन कांबळे, गजेंद्र बोकन, पूनम पांचाळ, संतोष ठाकूर, संतोष तिवारी, ईश्वर सातपूते, सूनिल राठी, महादेव पिटले, ऋषिकेश पांचाळ, यशवंत कदम, संतोष जाधव यांच्यासह भाजपा युवा मोर्च्याचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. अटलजींच्या विचारांवर तरूणांनी वाटचाल करावी भारतरत्न मा.अटलबिहारी वाजपेयी यांनी १९५१ ते २००९ या कालावधीत गेल्या सत्तर वर्षात केलेल्या कार्याची माहिती तरूणांना मिळावी, त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम जागृत व्हावे तसेच शेवटच्या घटकातील नागरिकांना न्याय देण्याची त्यांची भूमिका सर्वांपर्यंत पोहचावी या दृष्टिकोणातून अटल युवा संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कालावधीत झालेली विकास कामे, शिक्षणातील बदल, पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून झालेली कामे याची माहिती तरूणांना मिळावी आणि त्यांचे विचार आत्मसात करून पुढील वाटचाल करावी, असे आवाहनही भाजपा युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर यांनी केले.

### नेव्हीच्या माजी अधिकाऱ्यावर पोलीस ...

निसटण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या तरुणांनी गाडीवर देखील त्यांचा पाठलाग करीत अंबरनाथ पश्चिम भागातील नगरपालिका कार्यालय जवळ त्यांना पुन्हा चालू गाडीवर दांडक्याने मारण्याचा प्रयत्न केला. आपल्या जीवितास धोका असल्याचे लक्षात येताच ब्रिजेश कुमार यांनी अंबरनाथ पश्चिम पोलीस ठाणे गाठले. मात्र पोलिसांनी हा प्रकार शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने त्याठिकाणी तक्रार करण्याचा सल्ला दिला. ब्रिजेश कुमार यांनी या गावगुंडांची तक्रार करण्यासाठी पुन्हा शिवाजीनगर पोलिस ठाण्यात यावे लागले. शहरातील गावगुंड थेट पोलिस चौकी समोरच एका नेव्हीतील उच्चपदस्थ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनाच मारहाण करीत असतील तर त्यांच्यावर लगाम लावण्याची जबाबदारी कोणाची आहे असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### बँकांनी स्वयंसहाय्यता समूहांना ...

साधने उपलब्ध होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते असे प्रतिपादन केले. तसेच प्रत्येक बँकेची उद्दिष्ट व साध्य, बँकांचा प्रादेशिक विभागनिहाय दृष्टीकोन, भविष्यातील नियोजन आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बँकांसाठी प्रोत्साहन कार्यक्रम याविषयी माहिती दिली. एचडीएफसी बँकेने पतपुरवठ्याचे उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल बँकेला अभियानाकडून गौरविण्यात आले. एचडीएफसी बँकेने त्यांनी अंगिकारलेल्या कार्यपद्धतीबद्दल अन्य बँक प्रमुखांना माहिती देण्यात आली. याच कार्यशाळेत बँक ऑफ इंडिया सोबत ग्रामीण बचत गटांना अल्पदराने पतपुरवठा करण्याबाबत सामंजस्य कराराही यावेळी करण्यात आला.राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या वतीने श्री.राजेश देशमुख यांनी राज्यातील सर्व बँका महिला स्वयंसहायता समूहांना सर्वप्रकारे साकारात्मक मदत करतील व महाराष्ट्र हे देशात सर्वात पुढे राहील यासाठी प्रयत्न करतील असे प्रतिपादन केले. यावेळी अभियानाचे उपसंचालक डॉ.राजेश जोगदंड, अभियान व्यवस्थापक श्रीमती. कावेरी पवार राज्यातील सर्व प्रमुख बँकांचे अधिकारी, प्रतिनिधी आदि उपस्थित होते.

### १८ बंडखोर काँग्रेस नगरसेवकांना ...

वातावरण पसरले असून दरम्यानच्या काळात या सर्व बंडखोर नगरसेवकांनी तत्कालीन काँग्रेस अध्यक्षांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याने भिवंडी शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष शोएब खान गुड्डू उपमहापौर इम्रान वली खान माजी उपमहापौर अहमद सिद्दीकी यांसह बंडखोर नगरसेवकांनी समर्थकांसह महानगरपालिका मुख्यालया बाहेर गाण्याच्या तालावर नृत्य करीत आनंद सोहळा साजरा केला असून या निकालाने भिवंडी पालिका वर्तुळात काँग्रेस पक्षाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने चपराक लगावली असल्याचे बोलले जाते.विशेष म्हणजे कोकण विभागीय आयुक्तां कडील याचिकेवर निकाल देण्यास उशीर होत असल्याने माजी महापौर जावेद दळवी यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती त्यावर ३१ डिसेंबर पर्यंत निकाल घेण्याचे आदेश उच्च न्यायालयने दिले होते.

### महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य...

डॉ.प्रकाश जाधव यांचे संशोधक मार्गदर्शक तर सह-संशोधक मार्गदर्शक म्हणून स्वा.रा.ती.म.वि.नांदेड येथील सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक प्रोफेसर डॉ.घन:श्याम येळणे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार म्हणाले की, प्रा.डॉ.रावसाहेब दोरवे हे आमच्या समाजकार्य विभागातील सन १९८३-८४ या पहिल्या बॅचचे विद्यार्थी आहेत. त्यांनी सेवानिवृत्तीला अवघे दोन वर्ष राहिले असताना नेट परीक्षा व पी.एचडी.पदवी संपादन करून महाराष्ट्रातील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्यासमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे याचा आम्हा सर्वानाचा आनंद आहे. यावेळी प्रेमा कुंभार, बी.पी.सूर्यवंशी, ममता भडके, डॉ.संजय गवई व देविदास कांबळे यांनीही अभिनंदनपर मनोगत व्यक्त करून प्रा.डॉ.रावसाहेब दोरवे यांना पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

### सेवानिवृत्ती हे जिवनातील स्वल्पविराम ...

मुख्याध्यापक धनराज चिद्रे, श्री गुरु लिंगेश्वर पब्लिक एज्युकेशन सोसायटीचे संचालक जनकराज जीवने, व्यंकटराव बन, स्वर्णमाला यशवंतराव पाटील, आदित्य यशवंतराव पाटील, स्मिताताई अदित्य पाटील, रामराज मोरे, कमलाकर मोरे, प्रा.अनिल इंगोले, अनिल कांबळे, आनंद जिवने, पत्रकार बालाजी टाळीकोटे, गिरीधर गायकवाड, सचिन मंगनाळे, रणदिवे लक्ष्मण, राजकुमार साबणे, अनिल रोटे, बालाजी पाटील, सतिश बेद्रे, नागनाथ बिरादार, लखन जिवने आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य यशवंतराव पाटील म्हणाले की, स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे, प्रमोद महाजन यांच्या क्रपेने योगेश्वरीदेवी शैक्षणिक संस्थेचे रोपटे देवणी सारख्या सिमावर्ती भागांत लावलोय ते अविरत चालते आहे ते फक्त माझ्या कर्मचाऱ्यांमुळेच शासनाने घालून दिलेल्या उदिष्टांप्रमाणे ५८ वर्षे पूर्ण झाली की सेवा निव्रत्ती हि घ्यावीच लागते, परंतु मी आज नौकरीतून म्हणजे प्राचार्य पदातून मुक्त होत आहे. बाकीचे आयुष्य हे माझ्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थी मोठा झाला पाहिजे. यासाठी सदैव तत्पर असेन. आमची शाळा सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांना सामावून घेणारी शाळा आहे. या संस्थेचे कर्मचारी शासनाच्या जि.आर.प्रमाणे वागावे आणि शाळेची व विद्यार्थ्यांची प्रगती घडवून आणण्याविषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी प्राचार्य यशवंतराव पाटील व त्यांच्या सुविध्य पत्नी सुवर्णमाला यशवंतराव पाटील यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजकुमार हरकंचे यांनी केले. तर सूत्रसंचालन मलवाडे रामदास यांनी केले आणि आभार घोणसे आनंद यांनी मानले. या वेळी संस्थेचे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थ्यीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सोलापुरात वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी ...

समुपदेश यानंतर पुन्हा त्या वाहनधारकांना जेथे त्यांनी नियम तोडला त्या चौकात पोलीस गाडीतून नेऊन सोडण्यात आले. नव्या नियमानुसार वाहतूक नियम मोडल्यास मोठा दंड होणार आहे. प्रसंगी लायसन्स निलंबित होणार आहे हे टाळण्यासाठी वाहनधारकांनी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, अशी जागृती वाहनधारकांतून पोलिसांनी केली. २८ डिसेंबर ते २ जानेवारी या कालावधीत नो चलन उपक्रम राबवण्यात येत आहेत. नियम तोडणाऱ्या कोणत्याही वाहनधारकांना या कालावधीत दंड ठोठावणार येणार नाही. या सप्ताहात केवळ वाहतूक नियमांची जागृती करण्यात येणार आहे. त्यानंतर ३ जानेवारीपासून मात्र वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे सोलापूर शहर उत्तर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक राजन माने व शहर दक्षिण वाहतूक शाखेचे पोलीस चंद्रकांत वाबळे यांनी सांगितले.

### ग्रामीण भागातील कलाकारांचा ...

कलाकारांचा शुक्रवारी (दि.२४ डिसेंबर) गांध्रे येथील समाजगृहामध्ये सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. या समारंभात दर्शना जिरवा, परेश पाटील, भैरवी जाधव, वैभवी मोकाशी, पंडित यादव पाटील, विष्णू कुऱ्हाडे, प्रभाकर पाटील, श्याम पाटील, रोहित खुताडे, दीपक गोळे, अक्षय भोईर, बबलू पाटील, कौशिक जाधव व इतर कलाकारांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणात पत्र देऊन गौरविण्यात आले. ग्रामीण भागातील कलाकारांना अगदी माफक फी घेऊन त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातील पूर्ण प्रशिक्षण देण्याचे काम सोनाक्षी प्रॉडक्शन माध्यमातून केले जात असल्याची माहिती प्रफुल पाटील यांनी दिली. सदरच्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतअधिकारी भवानजी आगे पाटील, तहसीलदार उद्धव कदम, माजी नायब तहसीलदार दत्तात्रय पाटील, निवृत्त सैनिक रामसुमीरन बढाई, अभिषेक सिनेमाचे मालक के.जी.पाटील, जेष्ठ नागरिक हरिभाऊ पाटील आदी उपस्थित होते.

03 TO 09 JANUARY 2022 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 01/01/2022 9:04 PM Page 1



# जळगाव येथील भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशनच्या पथकाची प्रजासत्ताकदिनी होणाऱ्या पथसंचलनात निवड!




**जळगाव/प्रतिनिधी**

भारत सरकार यांच्या सांस्कृतिक मंत्रालय आणि रक्षा मंत्रालयातर्फे स्वातंत्र्याच्या ७५व्या अमृत महोत्सवाचा एक भाग म्हणून 'वंदे भारतम्-नृत्य उत्सव' ही राष्ट्रीय स्तरावरील नृत्य स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशनच्या विद्यार्थी कलावंतांची निवड झाली. निवड झालेल्या कलावंताना राजपथावर प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या सांस्कृतिक पथसंचलनात स्वप्रतिभेचा आविष्कार सादर करण्याची संधी प्राप्त होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राष्ट्रीय एकात्मता आणि कला संपदेचा उत्कृष्ट आविष्कार यांचा सुरेख समन्वय असलेला 'वंदे भारतम' उपक्रम आयोजित केला होता. देशभरातील सर्वोत्तम नृत्य प्रतिभा निवडणे हा या आयोजनामागील मुख्य उद्देश होता. प्रस्तुत उपक्रमात सहभागी होण्याकरिता नोव्हेंबर महिन्यात एकूण ३८७२ संघांनी नोंदणी केली होती. १८० फोक (लोकनृत्य), ८० क्लासिकल, ७० ट्रायबल आणि ४० फ्यूजन प्रकारात हे नोंदणीचे विभाग दिले होते. महाराष्ट्रातील एकूण ३६ जिल्ह्यांद्वारा विविध संघांच्या माध्यमातून ३४ नृत्य सादर करण्यात आले, त्यातून १२ संघ नृत्यांची निवड झाली होती. जळगाव जिल्हातील १५ संघांनी जिल्हास्तरीय स्पर्धेत नृत्य सादर केले होते. त्यातून १२ नृत्यांची निवड झाली होती. दिनांक ३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबरपर्यंत या उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आली, त्यात २८ राज्यातल्या नृत्य संघांचा सहभाग होता. विविध विभागात एकूण २१ व्हर्च्युअल इव्हेंट झाले, त्यात ३६२२ कलावंतांनी सहभाग घेतला होता. दि, ९ डिसेंबर ते १२ डिसेंबरपर्यत राष्ट्रीय स्तरावरील स्तरावरील स्पर्धा मुंबई, कलकत्ता, दिल्ली व बेंगलुरु येथे झाली, त्यात १३२२ स्पर्धकांनी नृत्य सादरीकरण केले. त्यानंतर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत ७ राज्याच्या ३८ संघ नृत्यांचे सादरीकरण झाले. त्यातून फक्त १५ संघांची निवड करण्यात आली होती. दि. १९ डिसेंबर २०२१ रोजी राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धा जवाहरलाल नेहरु स्टेडियम येथे आयोजित करण्यात आली होती. ८५० संघामधून नॅशनल ग्रॅण्ड फिनालेसाठी ६५ संघ सहभागी झाले. यातून राजपथावरील पथसंचलनासाठी भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशनच्या संघाची निवड करण्यात आली. निवडीबाबतचे प्रमाणपत्र सांस्कृतिक आणि परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री श्रीमती मीनाक्षी लेखी, रक्षा आणि पर्यटन राज्यमंत्री अजय भट्ट, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील नामवंत व्यक्ती इला अरुण, शिबानी कश्यप, प्रतिभा प्रल्हाद, शोभना नारायण यांच्यासह परीक्षक गीतांजली लाल, मैत्रेयी पहारी, संतोष नायर यांच्याहस्ते प्रदान करण्यात आले. मान्यवर परीक्षकांच्या निकषांनुसार पात्र ठरलेल्या आणि विशेष गुणवत्तेत असलेल्या निवडक १६ संघांची निवड करण्यात आली आहे. अभिमानास्पद बाब म्हणजे, भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशनच्या संघाने निवड समितीच्या सर्व चाचण्या पार करीत परिश्रम आणि कला-कौशल्य नैपुण्यासह स्पर्धामध्ये क्रमाक्रमाने यश प्राप्त केले. दि. २६ जानेवारी २०२२ रोजी, प्रजासत्ताकदिनी दिल्लीत नव्याने तयार होणाऱ्या सुशोभित जनपथावर सांस्कृतिक पथसंचलनात नृत्य सादर करण्याची संधी या निवडलेल्या संघांना प्राप्त झाली आहे. भारतातील तज्ज्ञ कोरिओग्राफर्सकडून निवड झालेल्या नृत्य संघातील सर्व कलावंतांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. सोनल मानसिंग, शोभना नारायण, शिबानी काश्यप, ईला अरूण, प्रतिभा प्रल्हाद, गीतांजली लाल, संतोष नायर, मैत्रेयी पहारी यांनी काम पाहिले.



**प्रजासत्तादिनाच्या परेडसोबत राजपथावर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळणार आहे. राजपथावर चालण्याचा आनंद खूप मोठा आणि अभिमानस्पद आहेच. आयुष्याच्या राजपथावर चालताना मात्र कर्तव्य भावनेने आयुष्य यशस्वी आणि सार्थक करायचे असेल तर भवरलालजी जैन अर्थात आमचे प्रिय दादाजींच्या विचारांच्या राजपथावर मला चालावे लागणार आहे, तोच माझा ध्यास आहे!**

**- पवन अर्जून खोंडे, विद्यार्थी कलावंत**

राष्ट्रीयस्तरावरील वंदे भारतम्-नृत्य उत्सवा'त भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन संचालित अनुभूती इंग्लिश मिडीअम स्कूलचे माजी विद्यार्थी सहभागी होऊन यशस्वी झाल्याचा आनंद अधोरेखित करण्यासारखा आहे. अनुभूती इंग्लिश मिडीअम स्कूलची स्थापना श्रद्धेय डॉ. भवरलाल जैन तथा मोठ्याभाऊंनी केली. सामाजिक बांधिलकीच्या अंत:प्रेरणेने विविध समाजोपयोगी उपक्रम त्यांनी हाती घेतले. सामाजिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि शैक्षणिक या सर्व उपक्रमातील शैक्षणिक उपक्रमाचा महत्त्वपूर्ण भाग या दृष्टीने अनुभूती इंग्लिश मिडीयम स्कूलकडे पाहिले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या समाजघटकातून विद्यार्थ्यांची रितसर निकषांनुसार निवड करून अनुभूती इंग्लिश मिडीअम स्कूलमध्ये प्रवेश दिला जातो.



**श्रद्धेय भवरलालजी जैन यांनी 'जे जे उत्तम-उदात्त-उन्नत म्हणती ते ते शोधत रहावे या जगती!' या व्यापक विचारांसह समाजातील गुणवत्तेकडे पाहिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'राष्ट्रीय एकात्मता आणि कला संपदेचा उत्कृष्ट आविष्कार' यांचा सुरेख समन्वय असलेला 'वंदे भारतम' उपक्रम आयोजित केला होता. प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या सांस्कृतिक पथसंचलनात कान्हदेशातील भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशनच्या पथकाची निवड झाली आहे, ही खरोखरच अभिमानास्पद बाब आहे. चांगलं पेराल तर चांगलच उगवतं!' वाडवडिलांनी सांगितलेल्या संस्कारांचीच ही फलश्रुती! कलावंतांना स्वप्रतिभेचा आविष्कार सादर करण्याची संधी प्राप्त होणार आहे. सर्व विद्यार्थ्यांचे, त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे ह्दयापासून अभिनंदन.**

**- अशोक जैन, अध्यक्ष, भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन**

**सांस्कृतिक उपक्रमात निवड झालेले कलावंत**

वेदांत बागडे, हेमंत माळी, विरेंद्र ताडे, उमेश झुरके, ललित हिरे, पवन खोडे, सनी शेटे, सचिन राजपूत, रोशन पवार, निकेश जाधव, रोहन चव्हाण, सुमीत भोये, मंगेश चौधरी, निर्मल राजपूत, रितीक पाटील हे असून, संघ प्रमुख सौ. रूपाली वाघ, नृत्यशिक्षक म्हणून नाना सोनवणे आणि सीमा गंगाणी यांनी मेकअप आर्टिस्ट या नात्याने जबाबदारी सांभाळली. या सर्व कलावंतांचे भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी अभिनंदन केले.

# भिवंडीत गुन्हेगारी घटनांमध्ये मोठी वाढ

## पोलीस उपायुक्त पदी आयपीएस अधिकारी देण्याच्या मागणीला वाढला जोर

**भिवंडी/प्रतिनिधी**

अति संवेदशील समजल्या जाणाऱ्या भिवंडी परिमंडळ २ अंतर्गत क्षेत्रात गुन्हेगारी घटनां मध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याने भिवंडीला सक्षम आयपीएस अधिकारी नेमण्याच्या मागणीला जोर वाढला आहे. सन २०२१ मध्ये २२ हत्याचे गुन्हे नोंद. तर दरोड्याच्या घटनेत मागील वर्षीच्या तुलनेत २५ ने वाढ होत ७७ वर पोहचली, घरफोडीच्या घटनेत २५ ने वाढ होऊन १४७ तर वाहन चोरीच्या घटनेत ६४ ने वाढ झाल्याने ती संख्या ४६२ वर पोहचली. तशीच ६४ने वाढ चोरीच्या गुन्हयात होत ती संख्या ५६२ वर पोहचली आहे. भिवंडी परिमंडळ क्षेत्रात दरोड्याच्या ७७ गुन्हे घडले असून चैन स्नॅचिंगच्या २५ घटनांचा समावेश असून त्यामध्ये अवघ्या ७ गुन्ह्यांची उकल पोलिसांनी केली आहे. दिवसा ३४ तर रात्रीच्या




अंधारात तब्बल ११३ घरफोडीच्या घटना घडल्या असून वाहन चोरीने नागरिक धास्तावले असताना वर्षभरात ४६२ वाहन चोरीचे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, त्यामध्ये ३६० दुचाकी, ७९ हलकी तर २४ अवजड वाहनांचा समावेश आहे. या गुन्हेगारी घटनां सह बलात्कार, अपहरण, विनयभंग यामध्ये विशेषतः अल्पवयीन पिडितांवर अन्यायाच्या घटना वर्षभरात वाढल्याचे दिसून येत आहे. वर्षभरात ५६ बलात्काराच्या गुन्ह्यांची नोंद असून त्यामध्ये १६ पीडितांचा समावेश आहे विनयभंगाचे ८३ गुन्हे असून त्यामध्ये ५८ अल्पवयीन पीडितांचा समावेश आहे. भिवंडी परिसरातील गोदाम पट्ट्यात सहज काम उपलब्ध होत असताना अल्पवयीन मुलींच्या अपहरणाच्या घटनेत मागील वर्षीच्या तुलनेत दुपटीने वाढ झाली आहे.अल्पवयीन पीडितांच्या अपहरणाच्या नोंद झालेल्या १५० घटनांमध्ये ३८ मुलांचा तर ११२ मुलींचा समावेश असून अजून ही २१ जणांचा शोध लागला नसून त्यामध्ये १७ अल्पवयीन मुलींचा समावेश आहे. तर दारूबंदीचे ११६ व मटका जुगार खेळणाऱ्यां विरोधात ५९ गुन्हे नोंद झाले आहेत. हुंडा प्रतिबंधक कायद्या अंतर्गत ८४ गुन्हे दाखल असून, हुंड्याची मागणी करून आत्महत्या करण्यास प्रवृत्त करण्याचे ७ तर हुंड्यासाठी हत्या केल्याच्या एका गुन्ह्याची नोंद आहे. फसवणुकीचे ७२ गुन्हे दाखल असून त्यापैकी ३३ गुन्ह्याची उकल करण्यात आली आहे. तर सरकारी कामात हस्तक्षेप करण्याच्या १२ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. हा सर्व गोषवारा पहिला असता २०२० या मागील वर्षीच्या गुन्हे टाळेबंदावर नजर टाकल्यास लॉक डाऊन काळात मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारी वाढली असताना २०२१मध्ये १४ डिसेंबरपर्यत घडलेल्या गुन्ह्यांची नोंद बघितल्यास पोलीस उपायुक्त या पदावर सक्षम आयपीएस अधिकारी हवा असल्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# सप्तफेरे वधू-वर सुचक केंद्राचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न

**लातूर/प्रतिनिधी**

येथील सप्तफेरे वधू-वर सुचक केंद्राच्यावतीने प्रतिवर्षी गुणगौरव सोहळा आयोजित केला जातो. धार्मीक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतीक, इतर सामाजिक क्षेत्रात कार्य करणार्या संस्था व पत्रकारिता क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान केला जातो. या वधूवर केंद्राच्यावतीने आतापर्यंत २०० व्यक्तींना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले आहे.

यंदाच्या पुरस्कार सोहळ्याचे हे नववे वर्ष असुन यावर्षीही हा सोहळा मोठ्या थाटामाटाच्या वातावरणात उत्साहात पार पडला.विविध क्षेत्रात कार्य करणार्यांची उचित दखल घेवून या वधूवर सुचक केंद्रामार्फत त्या-त्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींचा सन्मान संस्थेमार्फत केला जातो. ३० डिसेंबर २०२१ रोजी लातूर येथील प्रशासकीय इमारतीच्या डी.पी.डी.सी.हॉलमध्ये हा सोहळा पार पडला. औशाचे आमदार अभिमन्यु पवार हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून शिक्षक आमदार विक्रम काळे हे होते तर प्रमुख आकर्षण टि.व्ही.स्टार कलाकार बालाजी सुळ, सुप्रसिध्द प्लास्टीक सर्जन डॉ.विठ्ठल लहाने, जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, आघाडीचे बिल्डर डॉ.धर्मवीर भारती, मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष नरसिंह घोणे, उदगीर लिंगायत समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत अण्णा वैजापुरे, युवा उद्योजक नागनाथ गित्ते हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कारर्थींचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. या गौरव सोहळयामध्ये पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या झी चोवीस तासचे जिल्हा प्रतिनिधी शशिकांत पाटील यांना पत्रकार रत्न पुरस्कार देवून गौरविण्यात आले तर कोरोना काळात अखंड सेवा देणारे डॉ.गंगाधर परगे, डॉ.मोनीका पाटील, डॉ.अशितोष वैरागे, जुबेर सय्यद, डॉ.श्रीकांत कुलकर्णी यांना कोरोना योध्दा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

माहिती तंत्र शिक्षकरत्न म्हणून उदय देशपांडे, समाजरत्न पुरस्काराने दत्तात्रय माळी, साहित्यरत्न पुरस्काराने धनंजय गुडसूरकर, तंत्रस्नेही शिक्षणरत्न पुरस्काराने उमेश खोसे, कविरत्न पुरस्काराने भारत सातपुते, जीवन गौरव पुरस्कार महेंद्र साळवी, नृत्य कलारत्न पुरस्कार कु.सृष्टी जगताप यांचा सन्मान करण्यात आला. तर सामाजिक क्षेत्रात कार्य करणार्या लातूर जिल्ह्यातील आघाडीच्या संस्थापैकी एक ग्रीन लातूर वृक्ष टीमचा सत्कार वृक्षमित्र संवर्धन रत्न पुरस्कार देवून, तर रयत प्रतिष्ठान पुरस्कार, दिशा प्रतिष्ठान, प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ, महाराष्ट्र,निश्चल पुरी फाऊंडेशन यांना समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सप्तफेरे वधू-वर सुचक केंद्राचे संस्थापक अध्यक्ष संजय राजुळे यांनी केले. धनराजअप्पा परसने यांनी पुरस्कारार्थींची निवड कशी करण्यात आली याबद्दल माहिती दिली तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन गणेश परळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार गंगाधर डिगोळे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी संजय राजुळे, माधव तरगुडे, धनराजअप्पा परसणे, विठ्ठलराव राऊत, दत्तात्रय परळकर, बालाजीअप्पा पिंपळे, विद्यासागर पाटील, लोमटे एन.बी., मंचक रंडाळे, दत्तात्रय पवार ॲड.जितेंद्र पाटील, जितेंद्र सराफ, बसवराज पटणे, मनोज पटवारी, संतोष सोनवणे, योगनंद जोशी, गुरूराज माळेवाडे, भागवत भोसले, रविकांत जाधव, केशव येदले, राजकुमार चलवा, सुरेश पवार, अजयकुमार चलवा, संदीप मुतखेडे, भालचंद्र गुरव, सिध्देश्वर चलवदे, विकास राजुळे, वीरभद्र तरगुडे, विशाल पाटील, अमितअप्पा पाटील, चेतन पाटील, रामराज काळे, शंभु सुर्यवंशी, सुनिल ईबीतदार, गोविंद सांगवे, महेश बिडवे आदिंनी परिश्रम घेतले. हा कार्यक्रम कोरोनाचे सर्व नियमांचे पालन करून मोठ्या उत्साहात पार पडला.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने अवैध मद्यसाठा केला जप्त!



**लातूर/करकरे अंबादास**

लातूर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त कांतीलाल उमाप, संचालक श्रीमती उषा वर्मा, जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी दिलेल्या आदेशानुसार व विभागीय उप-आयुक्त पी. एच. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर जिल्हयातील अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, लातूर यांना मिळालेल्या खात्रीलायक माहितीनुसार अधीक्षक गणेश बारगजे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक, लातूर तसेच स्टाफ यांनी गुन्हा क्र. २७०/२०२१ अन्वये शिवाजी चौक, ढोकी-मुरुड रोड, ता. जि. लातूर या ठिकाणी दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी रात्री टाकलेल्या छाप्यामध्ये देशी मद्य १८० मिली च्या २४० बाटल्या व देशी मद्य ९० मिलीच्या १६०० बाटल्या तसेच गुन्हयामध्ये वापरलेली एक चारचाकी कार इंडीगो क्र. एम एच-२५-ए-३३३९ असा एकूण २ लाख ८७ हजार ४०० रुपयांचा मुद्येमाल जप्त केला सदर गुन्हयात आरोपी श्रीधर सत्यानारायण गुलापल्ली, नरेश गौड रामागौड अली, नितीन रमेश दासाराम असे तीन आरोपींना अटक करुन मुंबई दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल केला तसेच याचबरोबरच रेणापुर तालुक्यात व लातूर येथील ग्रामीण भागात इतर ४ ठिकाणी अनुक्रमे हॉटेल अनिकेत ढाबा, खानापुर फाटा, हॉटेल रानवारा ढाबा, पांढरी, तसेच लातूर तालुक्यातील हॉटेल तुळजाभवानी ढाबा, मळवटी, हॉटेल ग्रीन पार्क ढाबा, चिंचोली येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने छापे टाकून एकूण देशी २०२ लिटर, विदेशी ६ लिटर जप्त केली व सदर गुन्हयांमध्ये एकूण ७ आरोपींना अटक करुन ढाबे चालकांवर गुन्हे दाखल केले आहेत या सर्व कारवाईत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या लातूरच्या पथकाने एकूण २ लाख ९८ हजार ५३) इतक्या रुपयांचा अवैध मुद्येमाल जप्त करण्यात आला याप्रकरणी पुढील तपास निरीक्षक लातूर राहुल बांगर हे करत आहेत. या कारवाईमध्ये निरीक्षक राहुल बांगर, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गणेश गोले, निलेश गुणाले, जवान अनिरुद्ध देशपांडे, हनुमंत मुंडे, कपिल गोसावी यांनी सहभाग नोंदविला. अवैध मद्यविक्री विरोधात कारवाई यापुढेही चालु राहणार तसेच राज्य उत्पादन शुल्क, लातूर विभाग व पोलीस विभाग, लातूर यांच्यामार्फत रात्रीच्या गस्तीमध्ये ढाब्यावर बसून मद्यसेवनासाठी विनामद्यप्राशन परवाना जर कोणी मद्यप्राशन करतांना आढळल्यास त्यावर कारवाई होणार असल्याचे तसेच अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री ८४२२००११३३ क्रमांक व या कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणाऱ्याचे नांव गुप्त ठेवले जाईल असे आवाहन राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक गणेश बारगजे यांनी केले आहे.

# वारली चित्रकलेला जागतिक बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी चित्रकलाकार यांनी अर्ज करावे!

**पालघर/प्रतिनिधी**

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू, जि. पालघर अंतर्गत पालघर जिल्ह्यातील वारली या वैशिष्टपूर्ण चित्रकलेच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे तसेच त्यांची उत्पादने जागतिक मानांकानुसार तयार करून सदर उत्पादनांना विक्रीसाठी ऑनलाईन बाजारपेठ उपलब्ध व्हावी व दुर्गम ग्रामीण भागातील कारागीरांपर्यंत पोहोचून चित्रकलाकारांना सक्षम बनविण्याकरिता णऊखढ या संस्थेमार्फत विशेष योजना (उपक्रम राबविण्यात येणार आहे, तरी सदर योजनेमध्ये इच्छुक असणाऱ्या वारली चित्रकलाकार यांनी आपले अर्ज प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प डहाणू, जि. पालघर येथे सादर करावेत.

योजनेचे नाव :- Tribal Research nd Training Institute Project UDIT. योजनेसाठी



लाभार्थी पात्रता : लाभार्थी हा प्रकल्प कार्यालय डहाणू या म्हणजेच (डहाणू, तलासरी, पालघर, वसई) या तालुक्याच्या कार्यक्षेत्रातील असाव, लाभार्थी हा आदिवासी जमातीचा असावा, लाभार्थ्याकडे वारली चित्रकलाकार बाबतचे ओळखपत्र असल्यास प्राधान्य देण्यात येईल, लाभार्थ्याकडे विविध वस्तूंवर वारली चित्रकला करण्याचा चांगला अनुभव असावा, वारली चित्रकलामध्ये शासनमान्य संस्थेमध्ये, इतर कोणत्याही संस्थेमध्ये, प्रदर्शनामध्ये सहभागी प्रमाणपत्र असल्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा तपशील पुढिल प्रमाणे : उत्पादनांना ऑनलाईन बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबाबतचे प्रशिक्षण, व्यवहार हाताळणे, गुणवत्ता नियंत्रण, उत्पादन पॅकेजिंग प्रशिक्षण डहाणू येथे आयोजित करण्यात येईल. प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिन्यांचा असेल, लक्षांशापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास प्रशिक्षणार्थी निवडीचे सर्व अधिकार मा. प्रकल्प अधिकारी व निवड समिती यांना राहतील. सदर योजनेसाठीचे अर्ज प्रकल्प कार्यालय डहाणू येथे उपलब्ध करून देण्यात येतील विहित नमुन्यात अर्ज दि. ०५.०१.२०२२ पर्यंत प्रकल्प कार्यालय डहाणू येथे जमा करावेत. असे आवाहन आशिमा मित्तल, प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी यांनी केले आहे.



**अंधेरी येथील तेजस्वी महिला मंडळाकडून काल आयटीसी गार्डन येथे नव वर्षाचे स्वागत केक कापून करण्यात आले. या कार्यक्रमाला नगरसेवक जगदीश आणा यांच्यासह भारती संस्कृती सुरक्षा फाऊंडेशनचे हरिकुमार व्ही.नायर शरद येतं योगाचे सर तांबे आणि तेजस्वी महिला मंडळाच्या अध्यक्ष कल्पना हिंगवले यांच्यासह ॲड.विनय कुमार दुबे, शर्मीलराज, जयकुमार राघवन, राधाकृष्ण भास्करण, आशुतोष जोशी, संतोष मुरीप्पारा, कॅप्टन भूपाल चांद, प्रो. जस्मी सुधीर, उल्का नायर, स्नेहल महाडिक, मंगेश आरेकरनीलेश राजभर, शुभम दुबे, प्रवीण अजय वाघमारे तसेच तेजस्वी महीला मंडळाच्या आणि कल्पना हिंगवले योगा ग्रुपच्या कार्यकर्त्या मोठ्या संख्येने हजर होत्या.**

साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com

03 TO 09 JANUARY 2022 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 01/01/2022 9:05 PM Page 1



# शिवाजी महाराजांच्या आग्र्यातील स्मारकासाठी उत्तर प्रदेशातील आमदार उपाध्याय यांचा प्रयत्न




**वसई/प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांची आग्रा भेट आणि त्यांना औरंगजेबाने विश्वासघाताने केलेली कैद त्यातून महाराजांनी मोठ्या शिताफीने करून घेतलेली सुटका. हा एक मराठ्यांचा जाज्वल्य इतिहास आहे. मात्र या इतिहासाच्या स्मृती जपण्यासाठी आग्र्यात महाराजांचे भव्य स्मारक बनवावे अशी मागणी माजी अर्थमंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी केली होती. पण सरकारने त्याकडे गांभीर्याने पहिले नाही. मात्र उत्तर प्रदेश विधिमंडळातील भाजपचे आमदार योगेंद्र उपाध्याय यांनी शिवाजी महाराजांच्या आग्र्यातील स्मारकासाठी पाठपुरावा केला आणि जिथे महाराजांना औरंगजेबाने नजर कैदेत ठेवले होते ती जमीन सध्या खाजगी मालमत्ता आहे. ती महाराजांच्या स्मारकासाठी सोडवून घेण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारकडून साडेआठ कोटींचा निधी मंजूर करून घेतला. आता तिथे शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभा केला जाणार आहे. तसेच आसपासच्या ३५ एकर जागेत महाराजांच्या पराक्रमाची महती देणाऱ्या अफजलखान वध, शाहिस्तेखानाची बोटे तोडून केलेली फजिती. यासारख्या शिवकालीन ऐतिहासिक घटनांचे डिजिटल चित्रण आणि शिवशाहीशी संबंधित इतर बरेच काही उभे राहणार आहे. उपाध्याय यांच्या या कार्याचा गौरव म्हणून वसई व्यापारी मंडळाने त्यांचा भव्य सत्कार आयोजित केला होता. यावेळी उत्तर प्रदेशातील आमदार योगेंद्र उपाध्याय यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात उत्तर प्रदेश सरकारच्या वतीने उत्तर प्रदेशमध्ये नवनवे उद्योगधंदे उभारण्यासाठी आमंत्रण देऊन संपूर्ण सहकार्याची सरकारच्या वतीने ग्वाही दिली. प्रत्युत्तरादाखल उपस्थितांनी याबाबत संपूर्ण सहकार्याची घोषणा केली.

सुनील सिंह भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारणी विशेष निमंत्रित सदस्य तसेच शाळा संचालक यांनी या कार्यक्रमाचे मुख्य आयोजन केले होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, आग्र्यातील लोकांचा पाणीप्रश्न उपाध्याय यांनी सोडवला. त्यामुळे त्यांनी भागीरथ अशी पदवी देण्यात आली आहे. यावेळी वसई तालुक्यातील भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जळकोट पंचायत समिती अधिकारी व कर्मचारी निवासस्थानासाठी १३ कोटी मंजूर -संजय बनसोडे

**लातूर/करकरे अंबादास**



जळकोट येथील पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानासाठी राज्यशासनाच्या ग्रामविकास विभागाने १३ कोटीच्या निधीला प्रशासकिय मान्यता दिली आहे. पंचायत समिती मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाचा प्रश्न बरेच दिवस प्रलंबित होता. शासनाने यासाठी १३ कोटीचा निधी मंजूर केला आहे. पुढील काळात जळकोट येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे हे निवासस्थान उत्तमदर्जाचे सर्व सोईने युक्त व पर्यावरणपुरक करण्यात येईल अशी माहिती राज्याचे पर्यावरण, पाणीपुरवठा राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी दिली होती. पंचायत समिती हा ग्रामविकासाचा महत्तवाचा घटक असतो ग्रामीण विकासाला दिशा देण्याचे महत्त्वाचे काम पंचायत समितीच्या माध्यमातून होत असते यामुळेच येथे कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना सोई-सुविधा देण्यात येतात मागील काही काळापासुन पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उत्तम निवासस्थानाचा प्रश्न निर्माण झाला होता. येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवासस्थानी अभावी मोठ्या गैरसोईचा सामना करावा लागत होता यामुळेच या बाबतचा शासन स्तरावर सतत पाठपुरावा करुन त्यासाठी शासनाकडुन १३ कोटीचा निधी मंजुर करुन घेतला आहे. या निधीतुन सुमारे २६ उत्तम दर्जाचे निवासस्थाने निर्माण करण्यात येणार आहेत. ही निवासस्थाने उत्तम, सर्व सोई-सुविधेने युक्त व पर्यावरणपुरक असतील. या निवासस्थानामुळे येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवाराची उत्तम सोय होणार आहे. मागील दोन वर्षापासुन जळकोट शहराचा विकास अतिशय जलदगतीने होत आहे. पायाभुत सुविधासह सर्वांगीण विकासाला मागील दोन वर्षात चालना मिळाली आहे. आज राज्यशासनाच्या ग्रामविकास विभागाने हा निधी मंजुर केला आहे. लवकरच हे काम सुरू होईल अशी माहिती राज्याचे पर्यावरण, पाणीपुरवठा राज्यमंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे.

# भारतीयाच्या मनात अंत्योदय, एकात्म व मानवतावाद हे विचार रूजविण्याचे काम वाजपेयींनी केले -नितीन शेटे

**लातूर/प्रतिनिधी**




राजकीय क्षेत्रात पंतप्रधानपदापर्यंत पोहचणारे भारतीय जनसंघाचे अध्यक्ष, जनसंघाच्या संसदीय दलाचे नेते, जनता पक्षाचे संस्थापक सदस्य, भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष, ११ व्या लोकसभेतील विरोधी पक्षनेते, भारतीय परराष्ट्रमंत्री अशी अनेक पदे भूषवित स्व.अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या कार्यातून भारतीयाच्या मनात अंत्योदय, एकात्म व मानवतावाद हे विचार रूजविण्याचे काम केले असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाहक व अर्थभारती नागरी सह.पतसंस्थेचे अध्यक्ष नितीन शेटे यांनी केले.यावेळी ते भारतरत्न, माजी पंतप्रधान स्व.अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त सुशासन दिनानिमित्त स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारती जनता पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष गुरूनाथजी मगे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता युवा मोर्च्याचे प्रदेश सचिव दत्ता चेवले, रविकिरण केंद्रे, ॲड.गणेश गोजमगुंडे, ॲड.गणेश गोमचाळे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी पुढे बोलताना नितीन शेटे म्हणाले की, माजी पंतप्रधान स्व.अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधानपदी कार्यरत असताना महात्मा गांधीजींच्या अहिंसेची कास धरीत स्वा.सावरकर यांच्या उग्रभूमिकेचाही आग्रह केला. राजकीय जीवनामध्ये अनेकदा जय पराजयातून पंतप्रधान पदापर्यंत मजल मारली. १९५१ ला ते पहिल्यांदा निवडणुकीसाठी उभे राहिले आणि पराभूत झाले. १९५२ मध्ये जनसंघाचे पहिले खासदार म्हणून निवडून आले. अपमान जय पराजयातून ते घडले अन् पंतप्रधान पदापर्यंत पोहचले त्यामुळे भारताला सर्वसंपन्न बनविण्याची त्यांची आकांक्षा आज पूर्ण होताना दिसत आहे. असे मतही शेटे यांनी शेवटी बोलताना व्यक्त केले.यावेळी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष गुरूनाथ मगे यांनीही स्व.अटलबिहारी वाजपेयी ...पान ६ वर

# नेव्हीच्या माजी अधिकाऱ्यावर पोलीस चौकी समोरच हल्ला

**अंबरनाथ/प्रतिनिधी**



गाडीवर नंबर प्लेट नसताना आणि भरधाव वेगाने कट मारून जाणाऱ्या एका दुचाकीस्वाराला नेव्हीच्या एका अधिकाऱ्याने हटकल्याने दोघा तरुणांनी त्या अधिकाऱ्यावर हल्ला करीत जबर मारहाण केली. हा सर्व प्रकार शनिवारी सायंकाळी सहा वाजताच्या दरम्यान हुतात्मा चौकातील पोलीस चौकीच्या पायरीवरच घडला. पोलीस चौकी समोरच गावगुंड दबंगगिरी करीत असल्याने पोलिसांचा दरारा शिल्लक राहिलेला नाही हे उघड झाले आहे.

अंबरनाथमध्ये गावगुंडांना पोलिसांचा दरारा राहिलेला नाही हे पुन्हा एकदा उघड झाले आहे. शनिवारी सायंकाळी नेव्हीतुन निवृत्त झालेले अधिकारी ब्रिजेश कुमार सिंह हे अंबरनाथ पूर्व भागात स्वामी समर्थ चौकातुन आपल्या राहत्या घरी निघाले होते. यावेळेस स्वामी समर्थ चौकातून चार तरुण भरधाव वेगाने आणि मोबाईलवर बोलत अनेकांना कट मारून जात होते. त्यातील एका तरुणाला ब्रिजेश कुमार यांनी हटकले आणि मोबाईल वर बोलून गाडी नका चालू असा सल्ला दिला. मात्र या तरुणांना त्याचा सल्ला आवडला नाही, आणि त्यांनी थेट हुतात्मा चौकात ब्रिजेश कुमार सिंह त्यांच्या गाडी पुढे स्वतःची गाडी आडवी घालून त्यांना रोखले. सुरुवातीला त्या गावगुंडांनामध्ये आणि ब्रिजेशकुमार यांच्यामध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. यावेळी ब्रिजेश कुमार यांनी स्वतःची ओळख सांगत आपण नेव्हीतील अधिकारी असल्याचे सांगितले. मात्र त्या चार तरुणांपैकी दोघा तरुणांनी त्यांना न जुमानता थेट मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळेस ब्रिजेश कुमार यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केल्याने त्या दोघा तरुणांनी दगडाने आणि दांडक्याने ब्रिजेश कुमार यांना मारहाण केली. हा सर्व प्रकार हुतात्मा चौकातील पोलीस चौकी समोरच घडत होता.मारहाण सुरू असताना त्यातील एका तरुणाने शेजारी असलेल्या गॅरेजमधून सायलेन्सरचा रॉट घेऊन येण्यास सांगितल्याने ब्रिजेश कुमार यांना आपला जीवितास धोका निर्माण झाल्याची चाहूल लागली. चार गावगुंडांच्या तावडीत सापडल्याचा लक्षात येताच त्यांनी त्या गुंडांच्या तावडीतून ...पान ६ वर

# बँकांनी स्वयंसहाय्यता समूहांना संवेदनशीलता ठेऊन आर्थिक पाठबळ द्यावे - डॉ.हेमंत वसेकर



**नवी मुंबई/प्रतिनिधी**

सर्व बँकर्सनी ग्रामीण भागातील बचत गटांना कर्ज वितरण करताना संवेदनशील दृष्टीकोन जागृत ठेवायला हवा, असे प्रतिपादन अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. हेमंत वसेकर यांनी केले. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या राज्य कक्षाने आज नवी मुंबई कार्यालयात राज्यातील सर्व सार्वजनिक, खासगी व सहकारी क्षेत्रातील बँकर्सच्या राज्यस्तरीय प्रमुखांची विशेष कार्यशाळा आयोजित केली होती. राज्यातील स्वयंसहायता समूहांना योग्यवेळी पतपुरवठा उपलब्ध करणे, खाते उघडणे, समूह सदस्यांना विमा सुरक्षा कवच उपलब्ध करणे इ. महत्वाच्या विषयांवर या कार्यशाळेत चर्चा करण्यात आली. राज्यातील सर्व बँकर्स सोबत आयोजित चर्चासंवादात बँकांनी केलेल्या कामगिरीबाबत बँकनिहाय सारासार विचार केला गेला. कार्यशाळेमध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे अतिरिक्त संचालक परमेश्वर राऊत यांनी सादरीकरण केले. यावेळी राऊत यांनी रिझर्व बँकेच्या निर्देशांप्रमाणे बँकांनी प्राधान्य क्षेत्राला पतपुरवठा करणे अपेक्षित आहे, यामुळे वंचित घटकांना उपजिवीकेची ...पान ६ वर

# १८ बंडखोर काँग्रेस नगरसेवकांना कोकण आयुक्तांनी दिले अभय!

## बंडखोरी विरोधात दाखल याचिका फेटाळली



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी महानगरपालिकेच्या ५ डिसेंबर २०१९ रोजी झालेल्या महापौरपदाच्या निवडणुकीत सर्वाधिक ४७ नगरसेवक असलेल्या काँग्रेस पक्षातील १८ नगरसेवकांनी बंडखोरी करीत कोणार्क विकास आघाडीच्या पारड्यात आपलं मतदान करीत सत्तेत सहभाग घेतला होता. त्या विरोधात काँग्रेस नगरसेवक माजी महापौर जावेद दळवी यांनी कोकण विभागीय आयुक्तांकडे काँग्रेस नगरसेवकांच्या बंडखोरी विरोधात याचिका दाखल करून नगरसेवक पदावरून बडतर्फ करण्याची मागणी केली होती.या याचिकेवर कोकण विभागीय आयुक्तांनी निकाल देताना बंडखोरी विरोधात दाखल याचिका फेटाळून लावली.या निकालाने बंडखोरांच्या गटात आनंदाचे ...पान ६ वर

# महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांच्यातर्फे डॉ. रावसाहेब दोरवे यांचा सपत्नीक सत्कार!



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यांतील हंचनाळ (नदीवाडी) येथील मुळ रहिवासी आणि जवाहरलाल समाजकार्य महाविद्यालय, नांदेड येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारे डॉ.रावसाहेब दोरवे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड द्वारा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याच्या अंमलबजावणीत ग्रामपंचायतीची भूमिका-एक अभ्यास (संदर्भ नांदेड जिल्हा) या विषयावरील संशोधनासाठी पीएच.डी.पदवी नुकतीच प्रदान केली त्याबद्दल त्यांचा त्रैमासिक विचारशलाकाचे संपादक तथा महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार यांच्या हस्ते सपत्निक सत्कार करण्यात आला. यावेळी प्रेमा कुंभार, अनिता दोरवे, कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी.पी.सूर्यवंशी, संयम सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा ममता भडके, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ.संजय गवई, नांदेड येथील सामाजिक कार्यकर्ते देविदास कांबळे, संयम गवई, सार्थक गवई आणि सुमित भडके यांची उपस्थिती होती. डॉ.रावसाहेब दोरवे यांना या विषयावरील संशोधनासाठी मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई जि.बीड येथील प्राचार्य ...पान ६ वर

# सेवानिवृत्ती हे जिवनातील स्वल्पविराम आहे - प्राचार्य यशवंतराव पाटील



**देवणी/प्रतिनिधी**

प्रत्येक कर्मचाऱ्याच्या जिवनातील सेवानिवृत्ती हे एक स्वल्पविराम आहे, त्यामुळे या पुढे ही जिवनाचा सहभाग सातत्याने चालूच राहील आसे सेवानिवृत्ती निमित्ताने सत्काराला उत्तर देताना यशवंतराव पाटील यांनी मनोदय व्यक्त केले. देवणी येथील योगेश्वरी देवी उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य यशवंतराव पाटील यांच्या शैक्षणिक प्रदिर्घ सेवेनंतर शुक्रवारी दिनांक ३१ डिसेंबर २०२१ रोजी सेवानिवृत्ती समारंभ योगेश्वरीदेवी माध्य.व उच्च माध्यमिक विद्यालय देवणी येथे मोठ्या उत्साहात साध्या पद्धतीने संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गुरु लिंगेश्वर पब्लिक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष महेश पाटील होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून गुंडप्पा पटणे, सोमेश्वर हुडे, प्राचार्य गोपीनाथ सगर, मु.अ.गदगेअप्पा मानकरी, ...पान ६ वर

# सोलापुरात वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी वाहतूक प्रबोधनाचा डोस



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहरातील बेशिस्त वाहतूक सुधारण्यासाठी तसेच वाहनधारकांनी नियम पाळावेत याकरिता २८ डिसेंबर ते २ जानेवारीपर्यत वाहनधारकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. मंगळवारी शहरातील प्रमुख चौकांमध्ये सोलापूर शहर पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्तांसह, पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचाऱ्यांनी तसेच आर एसएसपीच्या विद्यार्थ्याकडून जनजागृतीचे उपक्रम राबवण्यात आला. जे वाहनधारक ट्रिपलसीट, विना हेल्मेट, मोबाईलवर बोलत जात होते. त्यांना थांबवून गांधीगिरी प्रमाणे त्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच त्यांच्या घरातील मोठ्या व्यक्तींना फोन करून मुले नियम कसे तोडतात त्याची माहिती देण्यात येत होती. तसेच पालकांना त्यांच्या पाल्यासमोरच वाहतुकीचे धडे देण्यात आले. नियम मोडणाऱ्या वाहनधारकांची वाहने त्या चौकात ठेवून त्यांना पोलीस गाडीतून शहर पोलीस मुख्यालयात नेण्यात आले. त्या ठिकाणी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या अधिकाऱ्याकडून वाहतुकीबाबत समुपदेशन करण्यात आले. वाहतुकीचे नियम पाळल्यास अपघातांचे प्रमाण कसे कमी होते त्याचा सर्वानाच कसा फायदा होतो, याबाबत जागृती करण्यात आली. भविष्यात वाहतुकीचे नियम तोडू नये हे लक्षात ठेवण्यासाठी त्यांना गुलाबपुष्प देण्यात आले. ...पान ६ वर

# ग्रामीण भागातील कलाकारांचा प्रांतअधिकारी भवानजी आगे पाटील यांच्या हस्ते सत्कार



**वाडा/प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील खेड्या-पाड्यात प्रतिभावंत कलाकार दडलेले आहेत, त्यांना योग्य मार्गदर्शन, प्रशिक्षण व लागणाऱ्या इतर सोयी सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांच्या कला, गुणांना वाव मिळत नाही, अशा कलाकारांना वेळ प्रसंगी आवश्यक ते सहकार्य करू असे प्रतिपादन प्रांतअधिकारी भवानजी आगे पाटील यांनी केले ते वाड्यातील कुणबी समाज गृहामध्ये आयोजित कलाकारांच्या सत्कार समारंभात बोलत होते. सोनाक्षी प्रॉडक्शनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कलाकारांना गायन, वादन, लेखन, नृत्य व अभिनयाचे प्रशिक्षण दिले जाते. सोनाक्षी प्रॉडक्शनच्या माध्यमातून आजवर प्रशिक्षण घेऊन बऱ्यापैकी यश प्राप्त केलेल्या ...पान ६ वर